# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २४/०५/२००६ (दि.२०/०५/२००६ ची तहकूब)रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

बुधवार दि. २४ मे २००६ (दि.२०/०५/२००६ ची तहकूब) रोजी मा.महापौर श्री.किशनचंद लेखराज तनवाणी यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.३५ वाजता वंदेमांतरम् या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त, नगर सचिव व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भगवान घडमोडे
०२. स.स.श्री.रेणुकादास वैद्य
०३. स.स.श्री.संजय शिरसाट
०४. स.स.श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर
०५. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०६. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०७. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०८. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०९. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
१०. स.स.श्री.धिल्लन तरविंदरसिंग महेंद्रसिंग
११. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१२. स.स.श्री.खान सलीम खान यासीन
१३. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१४. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१५. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१६. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१७. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१८. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
१९. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२०. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२१. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२२. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
२३. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२४. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२५. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
२६. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
२७. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
२८. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
२९. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३०. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३१. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
३२. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान

३३. स.स.सौ.राऊत छाया विलास
३४. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
३५. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
३६. स.स.सौ.शेख शमशाद बेगम शेख हफीज
३७. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
३८. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
३९. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
४०. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
४१. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
४२. स.स.सौ.रेखा कैलास काथार
४३. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
४४. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
४५. स.स.श्री.खेंडके संतोष सर्जेराव
४६. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
४७. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
४८. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
४९. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
५०. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
५१. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
५२. स.स.सौ.संगिता विठ्ठलराव जाधव
५३. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
५४. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
५५. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
५६. स.स.श्री.जोशी संजय रामदास
५७. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
५८. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
५९. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
६०. स.स.श्री.बारवाल गजानन
६१. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
६२. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
०२. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
०३. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०४. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र माणिकराव

**संवादः**

श्री संजय जोशी : आजच्या सभे्ला आवश्यक गणपूर्ती नाही
श्री संजय शिरसाट : गणपूर्ती अभावी 5 मिनीटे सभा तहकुब करावी
मा महापौर : 5 मिनीटासाठी सभा तहकुब करण्यात येते.
सुमारे 11.40 वा. सभा तहकुब होवून 11.45 वा. सभा सुरू झाली.

**विषय क्र. २४८/२ :**

श्री.के.के.फड,कर मुल्य निर्धारक व संकलक यांना दि.४.२.२००५ पासून एक वर्षाच्या प्रतिनियूक्तीच्या कालावधीसाठी मुदतवाढ देणेबाबत दि.२४.११.२००५ रोजीच्या सर्वसाधारण सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला. यास दि.१८.२.२००६ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेतील विषय क्रमांक ९९/२ नुसार श्री.के.के.फड, यांना महानगरपालिका कर मुल्य निर्धारक व संकलक या पदावर

दि.०४.०२.२००५ पासून एक वर्षाच्या प्रतिनियूक्तीच्या कालावधीसाठी ठराव पारीत झालेला आहे. प्रतिनियूक्तीचा कालावधी दि.०३.०२.२००६ ला संपलेला आहे.

श्री.के.के.फड,उप जिल्हाधिकारी यांना प्रतिनियूक्तीने प्रथम एक वर्षाकरिता महानगरपालिकेतील कर मुल्य निर्धारक व संकलक या पदावर दि.४.२.२००४ रोजी रूजू करून घेण्यात आले. यास दि.१९.१.२००५ रोजी झालेल्या मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.५२५/२ अन्वये मंजूरी दिलेली आहे.

कर मुल्य निर्धारक व संकलक यांच्या नियंत्रणाखाली महापालिका हद्दीतील नविन मालमत्ता शोध मोहीम सध्या राबविण्यांत आलेली आहे. सदरील मोहीम अद्यापही पूर्ण झालेली नाही. तसेच निवडणूक आयोगाने औरंगाबाद जिल्ह्यांसाठी नविन मतदार संघ घोषित केल्यामूळे व मा.आयुक्त, जनगणना, यांनी कळविलेल्या पत्रानुसार जनगणनेसाठी महापालिका हद्दीतील वॉर्डाची हद्द निश्चित करण्यासाठी अनुभवी अधिकाऱ्याची आवश्यकता असल्याने संबंधितास कामाचा अनुभव असल्याने त्यांना मुदतवाढ देणे आवश्यक वाटते.

करिता, श्री.के.के.फड, यांना महानगरपालिका कर मुल्य निर्धारक व संकलक या पदावर दि.०४.०२.२००६ पासून एक वर्षासाठी प्रतिनियूक्तीचा कालावधी प्रतिनियूक्तीच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून वाढून देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. संजय शिरसाट : मंजूर करण्यात येते.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : प्रतिनियुक्तीचा कालावधी् 1 वर्षाचा न ठेवता 2 वर्षाचा ठेवण्यात यावा. कामामध्ये स्थिरता येईल.

श्री. पुरूषोत्तम ठाकूर : श्री.फडसाहेब यांनी टॅक्स वसूली व निवडणूकीमध्ये चांगले काम केलेले आहे असे अधिकारी पाहिजे, मुदतवाढ दयावी.

श्री. गजानन बारवाल : मंजूरी देण्यास हरकत नाही. स्पेक इंडिया लि. यांचे कर आकारणी्च्या कामावर नियंत्रण नाही याचा सर्वांना त्रास होत आहे याची गंभिर दखल घे्ण्यात यावी.

मा. महापौर : सदर प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.के.के.फड, यांना महानगरपालिका कर मुल्य निर्धारक व संकलक या पदावर दि.०४.०२.२००६ पासून एक वर्षासाठी प्रतिनियूक्तीचा कालावधी प्रतिनियूक्तीच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून वाढून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४९/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, एकात्मिक मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत दिल्लीगेट सभोवताली डॉ.रफीक झकेरिया यांचे स्मरणार्थ वाहतूक बेट विकसित करणे या प्रस्तावित कामासाठी रक्कम रूपये १० लक्ष अनुदानास शासनाकडून मंजूरी प्राप्त झालेली आहे.करिता सदर प्रस्तावित कामासाठी सा.बां. विभागाच्या सन २००४-२००५ च्या दरसूचिनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून अंदाज पत्रकीय रक्कम रूपये १० लक्ष इतकी होत आहे. सदरील खर्च एकात्मिक मराठवाडा विकास कार्यक्रमातंर्गत प्राप्त होणाऱ्या शासकीय अनुदानातून करण्यात येणार आहे.सदरील प्रस्ताव दिल्ली गेटच्या मधून जाणाऱ्या रस्ता वाहतूकीस बंद करून वाहतूक बेट विकसित करण्याचा समावेश आहे व तद्नंतर भविष्यात दिल्ली गेटच्या पश्चिम बाजूने नविन रस्ता तयार करणेचे नियोजीत आहे.तसेच सदरील वाहतूक बेटास डॉ.रफीक झकेरिया यांचे नामकरण करणे प्रस्तावित आहे.करिता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपूढे मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

सौ.मसरत बेगम : दिल्लीगेट येथी्ल वाहतूक बेट विकास करणे्साठी प्रस्तावित 10 लाखाची तरतूद कमी पडते. मुख्य दरवाजालगतचा भाग आहे. चांगल्या पकारे सौंदर्यीकरण व्हावे यासाठी 5 लाखाची तरतूद वाढवून 15 लाख करण्यात यावी.

श्री.अ.रशिदखान (मामू ): आताच म्हटल्यापृमाणे् 5 लक्ष तरतूद वाढवून दयावी.

श्री.विनायक प्रभाकरराव पांडेः 10 लाख तरतूद कमी पडत असेल तर वाढवून देण्यात यावी. वाहतूकीच्या दृष्टीने पहावे. मंजूर करण्यास हरकत नाही.

श्री. संजय शिरसाट : शासनाकडून 10 लाख येणार आहे. प्रस्तावात दिल्लीगेटमधून जाणारा रस्ता वाहतूकीस बंद करून वाहतूक बेट विकसीत करण्याचा समावेश आहे. याच रस्त्यावर

पुढे डाव्या बाजूने झाडे कापू नये म्हणून रस्ता विकसीत करण्याचे थांबविण्यात आले होते. आज तेथे रस्त्याच्या बाजूला माठवाले, जुने साहित्य विक्रेते बसलेले आहेत. तेथे असलेले अतिक्रमण अडथळे दूर करावेत. पर्यावरण अबाधित ठेवून रस्ता खुला करण्यात यावा व त्याचा तातडीने विकास करण्यात यावा. आतील रस्ता बंद करून बाजूचे अतिक्रमण काढले नाही तर महत्व राहणार नाही.

श्री.अ.रशिदखान (मामू) : रोषणगेट,रंगीनगेट या दरवाज्याच्या दोन्ही बाजूने बांधकामे करून रस्ता तयार करण्यात आलेला आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:सदर घरे भूसंपादनामध्ये आहे त्यांना कोणत्या ठिकाणी स्थंलातर करण्यात येणार आहे.

श्री. गजानन बारवाल : ऐतिहासीक दरवाजे आहेत त्याला काय हरकत आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: सदर कामाचे अंदाजपत्रक 15 लाखाचे करून दुरूस्तीसह मंजूर करण्यात यावे.

मा. आयुक्त : यात दोन्ही गोष्टी बरोबर आहे पूर्वी भूसंपादनाच्या अंतर्गत झडाचा पण प्रश्न होता. बाजूने रस्ता करायचा त्यासाठी कॉस्ट काढली होती 30-31 लक्ष येत आहे ते जागेचे पैसे देऊन दोन्ही बाजूने रस्ता करायचा आहे मध्ला रस्ता बंद होईल आणि दोन्ही बाजूने रस्ता जाईल. हर्सूल टी पॉईट ते बाबा पेट्रोल पंपचा रस्ता, रस्ते विकास महामंडळ पुर्णपणे विकसीत करणार आहे. प्रस्ताव ठेवला होता मान्य केलेला आहे त्याचे मान्यतेसाठी आज प्रस्ताव पण आलेला आहे.

सौ.मसरत बेगम : सदर कामासाठी 5 लाख रूपये वाढवून अंदाजपत्रक मंजूर करावे.

मा.महापौर : दुरूस्तीसह मंजूर. तसेच या भागातील अतिक्रमण मा.आयुक्त यांनी स्वत: जातीने लक्ष देवून काढण्यात यावेत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार एकात्मिक मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत दिल्लीगेट सभोवताली डॉ.रफीक झकेरिया यांचे स्मरणार्थ वाहतूक बेट विकसित करणेच्या रक्कम रूपये १० लक्ष ऐवजी रू.१५ लक्ष पर्यंत खर्चाच्या अंदाजपत्रकास आणि सदरील वाहतूक बेटास डॉ.रफीक झकेरीया यांचे नामकरण करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री. प्रशांत देसरडा : दरवर्षी आपण विविध समित्या नेमतो. वृक्ष समिती अध्याप गठीत करण्यात आलेली नाही.

मा. महापौर : वृक्ष समितीचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे. सदस्यांचे नांव निश्चित करून द्यायचे आहे.

**विषय क्र. २५०/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गौतम नगर ते पिसादेवी रस्त्याचे डांबरीकरण करणे, या कामाच्या अंदाजपत्रकीय खर्च रू.२२,५०,०००/- ला दि.१९.१२.२००५ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत विषय क्र.१२९/१ नूसार मंजूरी मिळालेली आहे.

सदर कामात १.६० कि.मी. लांबीच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्याचा अंतर्भाव आहे. गौतमनगर ते पिसादेवी रोडवर महानगरपालिकेची हद्द ३ कि.मी. पर्यंत आहे. अंदाजपत्रकात १.६० कि.मी. एवढ्या रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे नियोजीत आहे. सदर रस्त्याच्या उद्घाटनाच्या प्रसंगी स्थानिक नागरीक व मा.आमदार यांनी उर्वरित १.४० कि.मी.रस्त्याची दूरूस्ती करीता मागणी केली. उर्वरित रस्त्याची अवस्था अत्यंत खराब आहे. करीता उर्वरित रस्त्याच्या दुरूस्तीसाठी वाढीव अंदाजपत्रक रक्कम रू.११.५० लक्ष (एकूण अंदाजपत्रकीय र.रू.३३.९३ लक्ष) ला मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद:**

श्री.मनमोहनसिंग ओबेराय: सदर काम निविदेशिवाय देता येणार नाही. अंदाजपत्रकीय रक्कमेत 10 टक्के वाढ झालेली आहे.

श्री. सुरे सिताराम : सदर रस्त्याचे पूर्ण डांबरीकरण करण्यात यावे.

श्री. प्रशांत देसरडा : पिसादेवी रस्त्याचे डांबरीकरणाचे काम हे वाढीव काम आहे. याबद्यल प्रशासनाची भूमिका काय आहे. निविदा काढून काम करणार किंवा कसे.

श्रीमती अजरा जबीन : सदर अंदाजपत्रक कोणत्या दराने केलेले आहे हे स्पष्ट केलेले नाही.

मा. आयुक्त : सदर प्रस्तावाला सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनंतर स्थायी समिती सभे्ची मंजूरी घेण्यात येईल.

श्री. प्रशांत देसरडा : अंदाजपत्रक करण्यात यावे व निविदा काढून नंतरच देण्यात यावे. प्रशासन नेमके काय करणार आहे,प्रशासनाची भूमिका काय आहे स्थायी समितीचा विषय हा वेगळा विषय आहे.

सौ.लता दलाल : 33.93 लक्षचा प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे. पूर्वी 22.50 लाख खर्चाचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे. 11.50 लाख वाढवायचे आहे. स्थायी समिती सभे्पुढे आणू शकलो असतो. हा सर्वसाधारण सभे्पुढे कशासाठी ठेवण्यात आला. सर्वसाधारण सभेपुढे विषय आणला होता असे काही दर्शवायचे का ?

मा. आयुक्त : यापूर्वी सर्वसाधारण सभे्ने सदर प्रस्तावास मंजूरी दिलेली आहे.

मा. महापौर : 11.50 लाखाची वाढीव कामे कोणत्या एंजसीकडून करून घेणार. पूर्वीच्या ठेकेदाराकडून करून घेणार किंवा इतराकडून करून घे्णार.

मा. आयुक्त : सदर प्रस्तावाला यापूर्वी सर्वसाधारण सभे्ने मान्यता दिली म्हणू्न सर्वसाधारण सभेसमोर सादर केले आहे. कोणतेही काम 20 लक्षचे वरचे असेल तर G.B. ची मान्यता पाहिजे.

श्री. वसंत नरवडे : सदर रस्त्याची लांबी वाढली असली तरी वाढीव अंदाजपत्रक 10 लाखाच्या वरचे आहे त्यामुळे ते स्थायी समितीपुढे जायला पाहिजे.

मा. आयुक्त : एकूण अंदाजपत्रकीय रक्कम 33 लाखाची होते म्हणून आणि यापूर्वी सर्वसाधारण सभे्त मंजूर झालेले असल्याने सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात आले आहे. आता काम कुणाला दयायचे स्थायी समिती ठरवेल.

श्री.प्रशांत देसरडा : वाढीव कामासाठी अंदाजपत्रक करायचे निविदा काढावी व काम करावे. शहराचा विकास होईल.

श्री. संजय शिरसाट : 1.6 कि.मी. लांबीच्या रस्त्यांसाठी 22.50 लाख खर्च लागतो व 1.4 कि.मी. साठी 11.50 लक्ष खर्चात कसे शक्य होईल.

अति.शहर अभियंता : जळगांव टी पॉंईट ते जाधववाडी पर्यन्त रस्त्याची रूंदी जास्त आहे व त्यापुढे जे 1.4 कि.मी. लांबीचा रस्ता आहे त्याची रूंदी 3 मिटर आहे आणि त्यावर जड वाहनाची वाहतूक नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : पत्र दयायला कोणी् सांगितले. कोणाकडूनही तशा सूचना नाही.

मा. महापौर : विकासाच्या बाबतीत हे सभागृह विरोध करीत नाही 12 लक्षचे वाढीव आलेले आहे.

सौ. लता दलाल : कोणत्याही विकास कामासाठी विरोध नाही. प्रशासनाची भूमिका चूकीची आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय: आमदाराचे नांव यायला नको ते वगळण्यात यावे.

श्री.संजय शिरसाट : प्रस्ताव चूकीच्या पध्दतीने आलेला आहे. स.सदस्य श्री ओबेराय म्हणतात त्याप्रमाणे् प्रस्तावात उद्या खासदाराचे, नगरसेवकांचे नांवे देखील येतील.

श्री.भगवान घडमोडे : विकासाचे प्रस्ताव असल्याचे प्रशासनाला वाटत नाही का, प्रस्ताव चुकीच्या पध्दतीने ठेवलेला आहे. दुरूस्तीसह मंजूर करावा.

श्री. संजय शिरसाट : आमदाराचे नांव वगळण्यात यावे.

मा. महापौर : दुरूस्तीसह मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दिर्शविल्याप्रमाणे, गौतम नगर ते पिसादेवी रस्त्याचे डांबरीकरण करणे, या कामाच्या उर्वरित रस्त्याच्या दुरूस्तीसाठी वाढीव रक्कम रू.११.५० लक्ष च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५१/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मराठवाडा विकास पॅकेज अंतर्गत मुलभूत सुविधांच्या विकासासाठी मंजूर विशेष अनुदानातून हाती घ्यावयाच्या कामात खालील कामांचा समावेश आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम रू. (लाखात) |
|---|---|---|
| ०१ | सेव्हनहिल चौक ते शिवाजीनगर ३० मी.रूंद रस्त्याचे डांबरीकरण करून | ५२५.०० |

| | | |
|---|---|---|
| | सुधारणा करणे. | |
| ०२ | बीड बायपास ते शहाशोक्ता दर्गा या २४ मी.रूंद डी.पी. रस्त्याचे डांबरीकरण करून सुधारणा करणे व पुल बांधणे. | ३५६.०० |
| ०३ | क्रांतीचौक ते महावीर चौक या अस्तित्वातील ३० मी.रूंद रस्त्याचे डांबरीकरण करून सुधारणा करणे. | १६९.०० |
| ०४ | धुत हॉस्पीटल ते नारेगांव रस्ता (गरवारे स्टेडीयम पर्यंत) ३० मी.रूंद रस्त्याचे डांबरीकरण करून सुधारणा करणे. | १७४.०० |
| ०५ | जळगांवरोड ते नारेगांव३०मी.रूंद रस्त्याचे डांबरीकरण करून सुधारणा करणे. | ९३.०० |
| ०६ | जिल्हाधिकारी कार्यालय ते जळगांव टी पॉईट ३० मी.रूंद रस्त्याचे डांबरीकरण करून सुधारणा करणे. | २२३.७४ |
| ०७ | जळगांव रोड ते जटवाडा रोड २४ मी.रूंद रस्त्याचे डांबरीकरण करून सुधारणा करणे. | १८१.०० |
| ०८ | हर्सूल रोड ते ऑडीटर सो.पर्यंत,१५ मी.रूंद रस्त्याचे डांबरीकरण करून सुधारणा करणे. | १०२.७० |
| ०९ | सिल्लेखाना चौक ते लक्ष्मण चावडी या २४ मी.रुंद रस्त्याचे डांबरीकरण करून सुधारणा करणे. | १३१.०० |
| १० | रंगारगल्ली, गुलमंडी चौक ते सिटी चौक १५ मी.रूंद रस्त्याचे डांबरीकरण करून सुधारणा करणे. | २१.६५ |
| ११ | लक्ष्मण चावडी चौक ते एम.जी.एम.१८ मी.रूंद रस्त्याचे डांबरीकरण करून सुधारणा करणे. | २०८.९२ |
| १२ | बाराभाई ताजिया चौक ते महात्मा फुले चौक १८ मी.रूंद रस्त्याचे डांबरीकरण करून सुधारणा करणे. | २१.२६ |

उपरोक्त यादीतील अ.क्र.१ चे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळाकडून करण्यात येण्याचे प्रस्तावीत होते. तथापी सदर काम आता महानगरपालिकेतर्फे हाती घेण्यात येत असून महानगरपालिकेकडून, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला द्यावयाच्या रू.३.५० कोटी एवढी रक्कम या कामास्तव वळती करून घेण्यात येत आहे.

तरी अ.क्र.१ ते अ.क्र.१२ या कामांच्या खर्चाच्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेची मंजूरी मिळणेच्या निर्णयास्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**संवाद :**

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : यापूर्वीही आलेले होते. प्रस्तावात उस्मानपुरा ते दर्गारोड नाही ते सामील करण्यात यावे. 15 लाख तरतूद ठेवावी.

मा. आयुक्त : महाविर चौक ते चिकलठाणा चौक पर्यन्त पूर्ण रस्ता घ्यावा म्हणून राज्य शासनाला विनंती केली होती त्यांनी विनंती मान्य करून ठराव आपल्याकडे पाठविलेला आहे म्हणून 3 क्रमांकाचे जे काम आहे ते करणार नाही. 5-6 दिवसापूर्वी पत्र आलेले आहे. त्याऐवजी एखादे नांव ॲड करू शकता.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉयः जालना रोड ते शहानुरमियाँ व उस्मानपुरा ते दर्गारोड या हद्दीमध्ये 6 नगरसेवकाचा भाग येतो. ते विकासाचे काम आहे कोणालाही श्रेय घ्यायचे नाही.

श्री. दत्ताभाउ पाथ्रीकर : मंजूरी देण्यात यावी.

श्री.अ.रशिदखान (मामू) : कटकटगेट ते सिडको या रस्त्याचा समावेश करण्यात यावा. तसेच सदर प्रस्तावातील अ.क्र. 4 वरील धूत हॉस्पीटल ते नारेगांव या रस्त्याचे काम 5-6 महिनेच झालेले आहे. त्याच प्रमाण् अ.क्र. 5 मध्ये दर्शविलेल्या जळगांव ते नारेगांव या 30 मि. रूंद डांबरीकरणाचे काम देखील अलीकडेच झालेले आहे. अ.क्र. 11 वर लक्ष्मणचावडी चौक ते एम.जी.एम. 18 मि. रूंद रस्त्याचे डांबरीकरणाचा प्रस्ताव आहे या प्रस्तावाप्रमाणे एम.जी.एम.पर्यन्त हे काम कसे पूर्ण् होईल. धूत हॉस्पीटल ते नारेगांव व जळगांव ते नारेगांव या रस्त्यांची कामे 5-6 महिन्यापूर्वीच झालेले आहे डबल कामे होतील. यातून बचत होत असेल तर दुसरीकडील कामे घ्यावीत. यासंदर्भात चौकशी करण्यात यावी एक कमीटी नेमावी. निधी शिल्लक राहत असेल तर कटकटगेट ते सिडको हा रस्ता त्यात पूर्ण होईल.

श्री. वसंत नरवडे : महात्मा फुले चौक ते शाहू महाराज यांचा पुतळा मिलकॉर्नर या रस्त्याचाही समावेश करण्यात यावा.

श्री. वैद्य रेणुकादास : 15 मिटर व 18 मिटर रूंद रस्ते न घेता 24 मिटर रूंद व त्यापेक्षा जास्त रूंदीचे व जे आवश्यक आहे त्याच रस्त्याचा समावेश असावा. त्यानुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना तशा सूचना देण्यात याव्यात. मागच्या वेळेस काही रस्त्याचा समावेश व्हावा म्हणून सूचना दिल्या होत्या आजही त्याचा उल्लेख दिसून येत नाही. रमानगर ते भाजीवाली बाईचा पुतळा या रस्त्याचा समावेश करण्यात यावा, त्याचा उल्लेख केलेला नाही.

मा. आयुक्त : महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना मार्च अखेर पर्यन्त शासनाला प्रस्ताव पाठविणे आवश्यक असते त्यावेळेस आपण नांवे दिलेली आहेत. आज आपण रस्त्याच्या नांवामध्ये दुरूस्ती केली तर त्यास शासनाची मंजूरी घ्यावी लागेल.

श्री. गजानन बारवाल : बाबा पेट्रोल पंप ते रेल्वेस्टेशन हा महत्वाचा रस्ता आहे तो प्राध्यान्याने घ्यावा.

मा. आयुक्त : महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना जे प्रस्तावित केलेले आहे ते आता आपण करणार.

सौ. लता दलाल : मिलकॉर्नर पासून ते महात्मा फुले पुतळा व तेथून पुढे तापडिया टेरेस रस्त्याचा प्रस्ताव तयार करीत असतांना मी पत्र देवून कळविले होते त्याचा देखील उल्लेख आलेला नाही. अंजलीजवळील पुलाचा देखील उल्लेख नाही. या रस्त्याचा विकास करणेमध्ये समावेश करावा व चुकीचे कारणे दाखवू नये.

श्री. पुरूषोत्तम ठाकूर : लिटल फलावर्स शाळेजवळच्या रस्त्याचा समावेश करण्यात यावा.

मा. आयुक्त : 25 कोटी मिळणार आहेत असे 2-4 दिवसापूर्वीच कळालेले आहे. डिफर पेमेंटवरील रस्ता शासनाकडून मंजूर झालेले आहे. शासनास प्रस्ताव सादर करणे गरजेचे होते म्हणून पूर्वी जे डिफर पेमेंटचे रस्ते मंजूर करून दिले होते. त्यातील 25 कोटीचे रस्ते शासनाकडून मंजूर करून करून आपले नांवात बदल असेल तर त्यास शासनाची मंजूरी घ्यावी लागेल. या व्यतिरीक्त जे काही रस्ते त्या ठरावात होते ते डिफर पेमेंटवर करणार आहोत. दोन्ही बरोबर होणार. 25 कोटी रोख स्वरुपात आलेले आहे. डिफर पेमेंटचे 10 कोटीचे टेंडर काढले ठरावात जे रस्ते आहेत ते डिफर पेमेंटवर करणार.

सौ. लता दलाल : बाराभाई ताजिया ते महात्मा फुले पुतळयापर्यन्तचा रस्ता घेतला आहे व त्यापुढे शाहू महाराजाचा पुतळा मिलकॉर्नर हा भाग सोडलेला आहे सलग घेण्यात यावे.

अति. शहर अभियंता : बाराभाई ताजिया ते महात्मा फुले पुतळयापर्यन्त 18 मिटर रस्ता आहे व 24 मिटर रस्ता आहे.

सौ. लता दलाल : महात्मा ज्योतिबा फुले पुतळा ते अप्सरा टॉकीज हा 24 मिटर रस्ता जागेवरून मोजून दाखवावा.

अति.शहर अभिंयता : मिलकॉर्नर ते अंजली सिनेमा पर्यन्त 24 मिटर रस्ता आहे. सारस्वत बँकलगत व्हावयाचा आहे.

सौ.लता दलाल : बाळकृष्ण मंदिराचा भाग सोडला तर बाकीचे राहिलेले आहे व तुकडया तुकडयामध्ये भाग राहिलेला आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉयः स.सदस्य सौ.लता दलाल व श्री नरवडें यांचे म्हणणे आहे की, हा पूर्ण रस्ता घेण्यात यावा.

मा. महापौर : दुरूस्ती केली तर हा प्रस्ताव पुन्हा शासनाकडे पाठवावा लागेल. स.सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहे ती कामे महानगरपालिका फंडातून होतील.

श्री सतिश कटकटे : सिल्लेखाना ते लक्ष्मण चावडी रस्ता डांबरीकरण करण्यात यावे.

श्री. अ.रशिदखान मामू : मी केलेल्या सूचनाचा खुलासा करावा.

अति.शहर अभियंता : दोन्ही रस्ते धूत हॉस्पीटल ते नारेगांव व जळगांव रोड ते नारेगांव हे रस्ते एम.आय.डी.सी.चिकलठाणा येथील असून त्यांची रूंदी 30 मिटर आहे त्यांनी 5 मिटर रूंदीसाठी विकास केला काही ठिकाणी पॅचवर्क केले. पूर्ण रस्ता केलेला नाही. 20 मिटर करायचे आहे 10 वर्षात कधीही काम केलेले नाही.

श्री.अ. रशिदखान (मामू): पूर्वी काम झालेले आहे चौकशी करावी. काम झालेले असेल तर पैसा कमी लागेल. लक्ष्मण चावडी ते कैलाश स्मशान भूमि हा रस्ता संपादन केलेला आहे का हा तेथ्‍ेच बंद होतो पुढे काम होणार आहे का. पुढील भाग संपादन करावा लागणार आहे.

मा. महापौर : बीओटी बांधा वापरा हस्तांतर करा या तत्वावर काही रस्ते दिलेले होते काही रस्ते दिलेले आहे व त्यात काही रस्त्यांचा समावेश केलेला होता. शासनाकडून अनुदानही आले हे रस्ते सोडून बाकीचे डिफर पेमेंटवर होतील. शासनाकडून मंजूर झालेले आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉयः शासनाला प्रस्ताव पाठविला होता त्यावेळी कटकटगेट ते सिडको या रस्त्याचा का समावेश केला नाही.

श्री. अनिल जैस्वाल : सिडको बसस्टॅण्डपासून हर्सूल टी पॉईटपर्यन्त एक पॅरलल रस्ता आहे त्या रस्त्याने मोठी रहदारी असते. पुढे जास्त रहदारी आहे त्या भागात अलीकडेच घटना घडलेली आहे. सर्व्हीस रोडही खराब झालेले आहे.

श्री. नारायण कुचे : नुतन कॉलनी ते सेवा योजन कार्यालयापर्यन्तचा रस्ता घ्यावा. तसेच सतिश मोटार ते सावरकरचौक पर्यन्तचा रस्ता यात घ्यावा.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : एक कमिटी नेमावी धोरण ठरविण्यात यावे जे जे रस्ते आवश्यक आहे ते महानगरपालिकेने घ्यावे. दोन्ही ठिकाणी आपलेच रस्ते आहे सिडकोचे सर्व्हीस रस्ते खराब झालेले आहे आवश्यक असेल तर तेही घ्‍ेण्यात यावे.

श्री. दाभाडे हिम्म्‌तराव : महानगरपालिकेतर्फे रस्त्याची कामे चालू आहे कामाच्या दर्जाकडे लक्ष नसावे असे दिसते. आंबेडकरनगर व पिसादेवी रस्त्याचे काम चालू आहे्. जाडी फक्त अर्धा इंच आहे . शासनाचा पैसा खर्च होतो याला अर्थ नाही. रस्त्याच्या कामाची चौकशी करून काम घ्यावे व खबरदारी घ्यावी.

श्री. भाऊसाहेब ताठे : सिडको हडकोचे रस्ते आलेले नाही त्यापैकी 1-2 रस्ते घेण्यात यावे. स्मशान भूमि- टी.व्ही. सेंटर 50 फुट रस्ता घ्‍ेण्यात यावा.

मा. महापौर :दुरूस्तीसह मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मराठवाडा विकास पॅकेज अंतर्गत मुलभूत सुविधांच्या विकासासाठी मंजूर विशेष अनुदानातून हाती घ्यावयाच्या कामात प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र. १ ते १२ कामांचा समावेश करण्यांस व अ.क्र.१ ते १२ या कामांच्या खर्चाच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, तसेच उर्वरित रस्ते डिफर पेमेंट मधून करण्यासही मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५२/६ :**

केंद्र शासनाच्या अपारंपारिक उर्जा स्त्रोत मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडे औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाराष्ट्र शासन पुरस्कृत-महा उर्जा) च्या माध्यमातून प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावाद्वारे महानगरपालिका क्षेत्रामध्ये अपारंपारिक उर्जा स्त्रोता अंतर्गत सौर सयंत्रे अस्थापीत करण्यात येतील. यात प्रामुख्याने खालील सयंत्राचा समावेश आहे.

| अ.क्र. | संयंत्राचे नांव | एकूण नग | अंदाजे एकूण खर्च | केंद्र शासनाचे प्रती नग अनुदान | केंद्र शासनाने मंजूर केलेले अनुदान |
|---|---|---|---|---|---|
| 01. | Street light solar control system | 20 | 4,00,000.00 | 5,000 | 1,00,000.00 |
| 02. | Solar street/garden light 75 W module & 18 WCFL | 100 | 24,00,000.00 | 12,000 | 12,00,000.00 |
| 03. | Illuminating hoardings. | 01 | 3,00,000.00 | 1,50,000 | 1,50,000.00 |
| 04. | Road Studs | 100 | 2,00,000.00 | 1,000 | 1,00,000.00 |
| 05. | Solar blinkers | 10 | 1,50,000.00 | 7,500 | 75,000.00 |
| 06. | Solar traffic signal | 1 | 5,00,000.00 | 2,50,000 | 2,50,000.00 |
| 07. | Power pack | 1 KW | 3,00,000.00 | 1,00,000 | 1,00,000.00 |
| 08. | BIPV System | 1 | 4,00,000.00 | 2,00,000 | 2,00,000.00 |
| | | **Total :** | **46,50,000.00** | **--** | **21,75,000.00** |

सदर प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्याचे महाउर्जाचे पत्र क्रमांक आरइएन/एसपीव्ही/०५-०६/२५८४ दिनांक १७ एप्रिल २००६ अन्वये प्राप्त झाले आहे. वरील कामासाठी अंदाजपत्रक एकूण रूपये ४६,५०,०००/- चे होते. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांची दिनांक २.५.२००६ रोजी मंजूरी प्राप्त झाली आहे. केंद्र शासनामार्फत या कामासाठी रू.२१,७५,००/- चे अनुदान प्राप्त होणार आहे. उर्वरित रक्कम रूपये २४,७५,०००/- ची तरतूद महानगरपालिकेस करणे आवश्यक आहे. वरील सर्व कामे दिनांक ३० जुन २००६ पूर्वी पूर्ण करणे बंधनकारक आहे. वरिल नमूद रक्कम रू.२४,७५,०००/- ची तरतूद मनपाच्या अर्थसंकल्प २००६-०७ मधील नविन पथदिवे बसविणे या लेखा शिर्षकात समावेश करण्याच्या व निधी उपलब्ध होण्याच्या मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद**

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉयः प्रस्ताव चांगला आहे. महानगरपालिकेकडे मोठी क्रेन नाही वाहन ओढणेसाठी मदत होईल. पोलिसाची ब-याच दिवसापासून मागणी आहे क्रेनची तरतूद करण्यात यावी.

मा. आयुक्त : क्रेनची निविदा काढली होती कोणीही आले नाही.

श्री. गजानन बारवाल : चांगली देखभाल दुरूस्ती होत नाही.

मा. आयुक्त : आपण देखभाल दुरूस्तीसह देत आहोत.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉयः पूर्ण बीओटीला आमच्या पक्षाचा विरोध नोंदवावा.

श्री. संजय जोशी : एकूण किती जागा लागेल व किती बचत होईल.

मा. महापौर : सदर विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, केंद्र शासनाच्या अपारंपारिक उर्जा स्त्रोत मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडे औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाराष्ट्र शासन पुरस्कृत-महा उर्जा) च्या माध्यमातून प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावाद्वारे महानगरपालिका क्षेत्रामध्ये अपारंपारिक उर्जा स्त्रोता अंतर्गत सौर सयंत्रे अस्थापीत करण्यांसाठी प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.१ ते ८ या सयंत्रासाठीचे र.रू.२४,७५,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील तरतूद महापालिकेच्या अर्थसंकल्प २००६-०७ मधील नविन पथदिवे बसविणे या लेखा शिर्षकात समावेश करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५३/७ :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहराच्या वर्ष २०३१ सालच्या अपेक्षित २५ लक्ष लोकसंख्येस आवश्यक असणाऱ्या क्षमतेची नविन समांतर पाणी पुरवठा योजना तयार करणे गरजेचे असल्यामूळे व योजनेची अंदाजीत रक्कम रू.२८० ते ३०० कोटी असल्यामूळे योजना तयार करणेसाठी प्रकल्प व्यवस्थापन संकल्पनार्थींची नेमणूक करून योजना म.न.पा.मार्फत राबविण्याकरीता संकल्पनांर्थींना वर्तमान पत्रातून जाहीर सूचना देवून चर्चेस पाचारण करण्यात आले होते.

दि.२७/०७/२००५ रोजी प्रकल्प व्यवस्थापन संकल्पनार्थींची बैठक घेण्यात आली. या बैठकीस ७ संकल्पनार्थी उपस्थित होते. बैठकीतील चर्चेनुसार समांतर पाणी पुरवठा योजनेकरीता P.M.C. ची नियूक्ती करावी किंवा योजना B.O.O.T तत्वावर राबवावी. याबाबत मा.स्थायी समितीची मंजुरी घेणेसाठी मा.आयुक्त यांनी सूचित केले. त्यानुसार मनपा स्थायी समिती सभा दि.२४.०८.२००५ विषय क्र.४२ नुसार योजनेकरीता प्रकल्प संकल्पनार्थींची निवड किंवा योजना B.O.O.T तत्वावर राबविणेपैकी एक प्रस्ताव अंतिम करून निर्णय घेणे बाबत मा.स्थायी समितीने मंजूरी प्रदान केली.

मनपाची आर्थिक परिस्थिती विचारात घेता सन २०३१ च्या नविन समांतर पाणी पुरवठा योजना फक्त संकल्पनार्थीकडून तयार करून घेतल्यास योजना उभारणी करीता आवश्यक असलेला निधी उपलब्ध करणे शक्य नसल्यामूळे योजना 'बांधा-वापरा-हस्तांतर करा' (B.O.O.T) तत्वावर राबविणे योग्य राहील, असा निर्णय घेण्यात आला.

या निर्णयानुसार मनपा निविदा सूचना क्र.४१/०५ दि.०७.१०.०५ नुसार नविन समांतर पाणी पुरवठा योजना B.O.O.T तत्वावर राबविणे करीता देश पातळीवरील वर्तमान पत्रांतून निविदा प्रसिध्द करण्यात आली. या सूचनेनुसार देशभरातील एकूण १८ संस्थांनी निविदा खरेदी केल्या. निविदा कार्यवाही

अंतर्गत दि.३०.११.०५, ५.१.०६, २४.१.०६ रोजी निविदा पूर्व बैठकी घेण्यात आल्या व सर्व संस्थांनी उपस्थित केलेल्या शंकांचे निरसन करण्यात आले.

निविदा पूर्व बैठकीत मुख्य मुद्दा चर्चेला गेला तो पाईप लाईन करीता आवश्यक असलेल्या जागेच्या संपादनाचा. सर्व निविदा धारकांनी पाईप लाईन करीता आवश्यक असलेल्या रूंदीची जागा पूर्ण लांबी करीता संपादीत करून देण्यात यावी, अशी अट घातली आहे. पाईप लाईन करीता आवश्यक असलेली जागा औरंगाबाद पैठण राज्य महामार्गाच्या हद्दीत उपलब्ध करून देणे बाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे विनंती करण्यात आली होती. त्यानुसार रितसर प्रस्ताव मा.मुख्य अभियंता, सा.बां.विभाग, यांचेकडे दि.१८.१.०६ रोजी सादर करण्यात आला. तथापी सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यांचे पत्र जा.क्र.का-९ रस्ते/१७३५ दि.१.४.२००६ नुसार औरंगाबाद पैठण राज्य रस्ता क्र.३० हा चौपदरी करण्यात येणार असून या रस्त्याच्या सद्याच्या मध्यरेषेपासून १९.५ मी.अंतरापर्यंत पाईप लाईन करीता जागा उपलब्ध होवू शकणार नाही, असे कळविले आहे. रस्त्याच्या मध्य रेषेपासून दोन्ही बाजूस १५ मी.अंतरापर्यंतची जागा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारीत आहे. त्याच्या बाहेर पाईप लाईन टाकण्याबाबत कळविले आहे. नविन समांतर पाणी पुरवठा योजनेकरीता आवश्यक असलेल्या साधारणत: २२०० ते २४०० मी.मी. व्यासाच्या पाईप लाईन करीता औरंगाबाद-पैठण राज्य महामार्गाच्या हद्दीतून जागा उपलब्ध होण्याची शक्यता नसल्यामूळे ही पाईप लाईन खाजगी जमीनीतूनच टाकणे गरजेचे आहे. या करीता ४.० मी.रूंदीमध्ये जमीन संपादीत करावी लागणार आहे. तसेच राज्य रस्त्याच्या हद्दीतून जलवाहीनी टाकण्यास जागा उपलब्ध होणार नसल्याने पाईप लाईनची लांबी अंदाजे ५ कि.मी. ने वाढणार आहे.
याकरीता आवश्यक असलेल्या अलायनमेंट (Alignment) मधील जमीन संपादीत करण्यासाठी कॅडेस्ट्रीयल सर्व्हेक्षण करणे गरजेचे आहे. कॅडेस्ट्रीयल सर्व्हेक्षण करणेसाठी उपलब्ध संस्थेमार्फत सर्व्हेक्षण करीताचे दर मागविण्यात आले असून कॅडेस्ट्रीयल सर्व्हे करीता अंदाजे रू.६.७५ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

नविन समांतर जलवाहिनीच्या निविदा प्रक्रियेमध्ये दर भरून निविदा दाखल करण्यासाठी दि.३१ जुलै २००६ ही तारीख निश्चित करून सर्व निविदा धारकांना कळविण्यात आलेली आहे. जलवाहीनी टाकण्यासाठी आवश्यक जागा संपादीत करून बी.ओ.टी. धारकास लवकर हस्तांतरीत करावी लागणार आहे. याकरीता भूसंपादनाची कार्यवाही त्वरीत हाती घेणे गरजेचे आहे. कॅडेस्ट्रीयल सर्व्हेक्षण केल्यानंतर भूसंपादनासाठी लागणारा खर्च व जिल्हा/तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालयामध्ये भरावी लागणारी रक्कम (लिगल फिज) इ.खर्चाच्या बाबी निश्चित होणार आहे. आज रोजी काढलेला खर्च हा ढोबळ मानाने काढलेला असून भूसंपादनासाठी अंदाजे रू.४५० लक्ष रकमेचा खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्तप्रमाणे नविन समांतर जलवाहिनी टाकण्याकरीता कॅडेस्ट्रीयल सर्व्हेक्षण करणे व भूसंपादन करणे आवश्यक आहे. यासाठी लागणाऱ्या खर्चाची तरतूद अर्थसंकल्प २००६-२००७ मध्ये करून अशाप्रकारे करावयाच्या कार्यवाहीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री. गजानन बारवाल : समांतर जलवाहिनी व्हावी चुकीच्या ठिकाणी टाकली जाणार नाही याची काळजी घ्यावी. विद्यमान पाणी पुरवठा वाहिन्या काही ठिकाणी रस्त्यापासून जवळ टाकण्यात आलेल्या आहेत त्यामुळे अनेकवेळा रस्त्याचा विकास करता येत नाही. जलवाहिनीसाठी जागा प्रथम संपादन करण्यात यावी. कोणती जागा संपादन करणार कधी करणार याचा तपशील दयावयास पाहिजे.

मा. आयुक्त : समांतर जलवाहिनी नक्षत्रवाडी येथील संतुलन टाकीपर्यन्त आहे. ज्या जागा उपलब्ध होत नाही त्याठिकाणी संपादन करायची.

श्री. संजय शिरसाट : यासंदर्भात अंथसंकल्पात तरतूद केलेली आहे काय.

मा. आयुक्त : भूसंदपानासाठी तरतूद केलेली आहे. उर्वरीत पुढील अर्थसंकल्पामध्ये दृष्टोपत्तीस येईल.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : सदर प्रस्तावात आर्थीक तरतूदी संबंधी सांगड घातलेली नाही. प्रस्तावात B.O.O.T. नमूद केलेले आहे. पाणी पुरवठा करताना महानगरपालिकेस काही अडचण निर्माण होणार नाही का . कलम 95,96,101 प्रमाणे स्थायी समिती सभेने मंजूर केलेले आहे काय. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सिडकोसाठी 67

कोटीची योजना तयार केली होती. सिडको हडको व नजीकच्या 16 वस्त्यांना 2031 सालची लोकसंख्या गृहीत धरून पाणी पुरवठा करण्यासाठी 790 एम.एल.डी् पाणी लागणार आहे.

मा. महापौर : बी.ओ.टी. वरील प्रस्ताव यापूर्वीच सर्वसाधारण सभेने मंजूर केलेला आहे. भूसंपादनासाठी 4.5 कोटी लागणार आहे.

श्री.अ.रशिदखान(मामू) : नविन जलवाहिनी बी.ओ.टी.वर करणार आहोत. आज अर्धा इंच व्यासाच्या नळजोडणीसाठी सध्या 1800 रूपये दयावे लागतात नंतर मात्र 7-8 हजार बिले येईल. सध्या आपणांस अर्धा इंच व्यासाच्या नळजोडणीसाठी 3600 रूपये खर्च येतो व प्रत्यक्षात आपण 1800 घेतो. हर्सूल तलावावरून देखील पाणी पुरवठा होतो त्या पाणी पुरवठयासाठी पाणी पटटी कमी घेणार का. या विषयावर चर्चा होणे आवश्यक आहे.

मा. महापौर : समांतर जलवाहिनीसाठी मंजूरीनंतर निविदा काढण्यात येतील. दर काय ठरणार आहे ही नंतरची बाब आहे ते सभागृहासमोर येईलच. 2031 मध्ये शहराला जे पाणी लागणार आहे त्या योजनेसाठी आपणांकडे तेवढा निधी कुठून उपलब्ध करणार. आपणांस बी.ओ.टी. वर जावे लागेल. सदर विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नविन समांतर जलवाहिनीच्या भूसंपादनासाठी लागणाऱ्या र.रू.४५० लक्ष रकमेच्या खर्चास तसेच नविन समांतर जलवाहिनी टाकण्याकरीता कॅडेस्ट्रीयल सर्व्हेक्षण करणे व भूसंपादन करणे आवश्यक आहे. यासाठी लागणाऱ्या खर्चाची तरतूद अर्थसंकल्प २००६-२००७ मध्ये करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५४/८ :**

सहाय्यक संचालक नगर रचना,महानगरपालिका औरंगाबाद हे दुरूस्त प्रस्ताव सादर करीत आहे की, मौजे पहाडसिंगपुरा येथील सर्व्हे नंबर ४२/४ मिळकतधारक श्री.भालचंद्र गोटे, आणि सर्व्हे नंबर ३७/पैकीचे मिळकत धारक श्री.शितलचंद एस.डहाळे तसेच मौजे हिमायतनगर येथील सर्व्हे नंबर ९८/पैकीचे हितसंबंधीत सेक्रेटरी, स्वयंसिध्दा गृह निर्माण संस्था आणि अध्यक्ष जिल्हा परिषद शिक्षक गृह निर्माण संस्था यांनी मंजूर विकास योजनेच्या प्रस्तावीत २४.०० मीटर रूंद रस्त्यात वरिल नमूद जमीनी मधील बाधीत क्षेत्रासाठी वेगवेगळ्या अर्जानुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम-१९६६ चे कलम-१२७ नुसार महानगरपालिकेस खरेदी सूचना दिलेल्या आहे.

औरंगाबाद शहराची मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) सन १९९१ मध्ये मंजुर होवून अंमलात आलेली आहे. संबंधीतांनी उक्त विकास योजनेतील २४.०० मीटर रूंद रस्त्यात बाधीत क्षेत्रासाठी खरेदी सूचना दिलेल्या आहे. वरील खरेदी सूचना दिलेल्या हितसंबंधितांच्या जमीनीचे भागश: क्षेत्र उक्त २४.०० मीटर रूंद रस्त्यात बाधीत होत आहे. उक्त सर्व्हे नंबर ४२/४ चे मिळकतधारक श्री.भालचंद्र एल.गोटे यांनी अर्ज देवून कळविले की, त्यांनी त्यांच्या मिळकती बाबत कोणतीही खरेदी सूचना दिलेली नाही. कोणीतरी त्यांची खोटी स्वाक्षरी करून खरेदी सूचना अर्ज दिलेला होता. मात्र दरम्यानचे काळात श्री.गोटे यांनी दिनांक ०८.०५.२००६ रोजी जो अर्ज दिला त्यानुसार प्रस्तावीत रस्त्याच्या भूसंपादनासाठी त्यांचा विरोध नाही. तसेच भूसंपादनाची कार्यवाही लवकरात-लवकर करावी. आणि त्यांचा अर्ज महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम-१९६६ चे कलम-१२७ अन्वये खरेदी सूचना समजून कार्यवाही करावी, असे नमूद केले आहे. दिनांक ०८.०५.२००६ रोजी सहाय्यक संचालक नगर रचना,महानगरपालिका,औरंगाबाद यांच्या दालनात झालेल्या सुनावणी दरम्यान श्री.शितलचंद एस.डहाळे, सेक्रेटरी स्वयंसिध्दा गृह निर्माण संस्था आणि अध्यक्ष जिल्हा परिषद शिक्षक गृह निर्माण संस्था हे उपस्थित होते व यांनी कलम-१२७ ची नोटीस दिल्याचे स्पष्ट केले.

उर्वरीत खरेदी सूचनेतील २४.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्यात बाधीत भागश: क्षेत्राचा विचार केल्यास तेवढेच क्षेत्र भूसंपादनासाठी घेतल्यास आरक्षणाचा हेतू सफल होणार नाही. त्यासाठी हिमायतनगर येथील सर्व्हे नंबर ९९ व १०६ मधून सुरू होणारा आणि पहाडसिंगपुरा येथील सर्व्हे नंबर ३७ व ३८ च्या

पश्चिमेकडील अस्तित्वातील रस्त्यास मिळणाऱ्या २४.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्यामध्ये बाधित क्षेत्राचे संपादन करणे जरूरीचे आहे.

उक्त रस्त्यात मौजे पहाडसिंगपुरा येथील सर्व्हे नंबर ३७,३८,३९,४१ आणि ४२ तसेच मौजे हिमायतनगर येथील सर्व्हे नंबर ९८,९९,१०६ आणि १०८ मधील जमीनी बाधित होत असून २४.०० मी. रूंद रस्त्याची लांबी अंदाजे १६००.०० रनिंग मीटरसाठी भूसंपादनाचा अंदाजित खर्च रूपये २.१० कोटी अपेक्षित आहे. आरक्षणाचा हेतू सफल होण्यासाठी खरेदी सूचना दिलेल्या सर्व्हे नंबर मधील बाधित क्षेत्रा व्यतिरिक्त उक्त रस्त्यात बाधीत सर्व्हे नंबर ३८,३९, ४१,९९ व १०६ आणि १०८ या जमीनीतील बाधीत क्षेत्राचा समावेश करण्यात आला आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम-१९६६ चे कलम-१२७ मधील प्रयोजना नुसार मंजूर विकास योजनेच्या अंमलात आलेल्या तारखेपासून दहा वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्यास उक्त कलमान्वये दिलेली खरेदी सूचना लागू होते आणि खरेदी सूचना लागू झाल्यास खरेदी सूचना बजावल्याच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत रितसर भूसंपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. नसता विकास योजना मधील आरक्षण व्यपगत होते.उक्त मंजूर विकास योजनेस दहा वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने खरेदी सूचना लागू होत आहे. करीता दिनांक २३.०५.२००६ पूर्वी भूसंपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे.

सबब प्रकरणात पुढील कार्यवाही होणेस्तव दुरूस्त प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर ठेवून प्रकरणात भूसंपादनास लागणाऱ्या खर्चासह मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री. विनायक पांडे :मौजे पहाडसिंगपूरा येथील सर्वे नंबर ४२/४ मिळकतधारक व श्री. भालचंद्र गोटे, आणि सर्वे नंबर ३७ पैकीचे मिळकत धारक श्री. सितलचंद एस डहाळे तसेच मौजे हिमायतनगर येथील सर्वे नंबर९८ पैकीचे हितसंबधीत सेक्रेटरी स्वयंसिध्द गृह निर्माण संस्था आणि अध्यक्ष जिल्हा परिषद शिक्षक गृह निर्माण संस्था यांनी मंजूर विकास योजनेच्या प्रस्तावित २४.००मीटर रूंद रस्त्या संबधी मी बोलतो आहे. शितलचंद डहाळे व गोटे यांची जी जमीनआहे ती हनुमान टेकडी डोंगराला रस्त्याला लागून आहे. इ थपासून भंसूपादनाला सूरूवात करणार आहोत का आणि पूढे हा रस्ता कोठे मिळविणार आहे. यात खूप असे मोठे गौड बंगाल आहे. बाजूला कब्रस्तान असूनबाजूला अनेक लोकांची शेती आहे.याविषयाला माझा विरोध आहे.

मा.आयुक्त :भूंसपादन करण्यास प्रशासनाला कोणताही रस नाही परंतू कायदा असा आहे की, कोणाचीही जागा मंजूर विकास योजनेच्या आरक्षणामधे असेल तर त्याला १० वर्षाच्या नंतर नोटीस देता येते. नोटीस मिळाल्यापासून जर सहा महीण्याच्या आत भूसंपादनाची कार्यवाही केली नाही तर आरक्षण लॅप्स होते. संबधीतांनी लिगल नोटी दिल्यामूळे सहा महिण्याच्या आत मा. जिल्हाधिकारी यांचेकडे हा प्रस्ताव पाठविणे आवशयक आहे जर पाठविले नाही तर ही जागा आरक्षणातून व्यपगत होईल.आणि हा डि.पी रोड ड्रॉप करावा लागेल. आपल्याला या संदर्भाने निर्णय घ्यायचा आहे .

श्री. संजय जोशी :विरोध भूसंपादनास नव्हताच श्री. भालचंद गोटेचे नाव आले कसे हा प्रश्न होता. आताच मा.आयुक्तांनी म्हटले की रस्त्यासाठी जागा घेणे गरजेचे आहे. चार महिनेउशीर का झालेला आहे. शेवटच्या महिण्यात सभागृहात प्रस्ताव येतो हे कितपत योग्य आहे. १२७ नोटीस देवून दोन महिने झाले मागिल महिण्यात ठराव आला होता. सभागृहाला सुध्दा निर्णय घेण्यासाठी वेळ दयायचा पाहिजे. ती जागा घ्यायची किंवा नाही हे सभागृह ठरवेल दूसरे असे की ते नो डेव्हलपमेंन्ट झोन मधे येते. भविष्यात तेथे डेव्हलप होईल परंतू आणखी पाच ते सात वर्ष डी. पी प्लॅन होत नाही. तोपर्यत नो डेव्हलपमेंन्ट झोन मधील डेव्हलपमेन्ट झोन मधे येणार

नाही. यासाठी प्रशासनाचा इन्ट्रेस आहे असे आम्ही मूळीच म्हटलेलो नाही. मागिल वेळेस सहा तास या विषयावर चर्चा झाली. मागिल वेळेस सहा. संचालक यांना एवढे बोलून सूधदा आता गोटेला बोलवून त्याचेशी वैयक्तीक बोलणी केली हा विषय मान्य आहे अशी दुरूस्ती करून ठराव आणला .मा. मुख्य सचिव यांना श्री. गोटे यांनी २०-२० रूपयाचया बॉण्डवर मी कुठली ही मागणी केलेली नाही म्हणून ॲफिडेव्हिट करून दिलेले आहे. त्यासर्व कागदपत्र मी मा.महापौर व आयुक्त यांना सादर केलेले आहे. माझे चुकले आहे असे पून्हा श्री.गोटेने मुख्य सचिव तसेच मा. आयुक्तांना तसे लिहून दिले का यात दिले की ८.५.२००६ रोजी गोटे आले आणि त्यांनी अर्ज दिला की आता भूंसपादन करण्यासविरोध नाही. जे बॉण्डवर ॲफिडेव्हिट करून देतात त्याना १५ दिवसांत का बुध्दी सूचली याचा खूलासा करावा. मूळ खूलासा पाहिजे. तो करावा.

श्री.मनमोहनसिंग आबेरॉय :पहिला प्रश्न आहे भूसंपादन करायचे की नाही. सहा महिने त कार्यवाही केली नाही तर डिलीट होईल. मालकास अधिकार राहील काहीही करेल. २० बाय २० चे प्लॉट पाडील झोपडपट्टी तयार होईल. त्यानंतर जर हे काम करायचे झाल्यास होणार नाही. डी. पी प्लॅन नूसार ती जागा आवशक वाटत असेल तर हा प्रस्ताव पाठविण्यात यावा.

श्री.गजानन बारवाल :१२७ची नोटीस संबधीत मालकाने दिल्यानंतर त्यावर काहीतरी निर्णय घ्यायलाच पाहिजे. जर जागा ताब्यात घेतली नाही तर भविष्यात मोठी अडचण निर्माण होणार आहे. योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री. प्रशांत देसरडा :मागिल बैठकीत या विषयावर चर्चा झालेली होती. पून्हा काही सूधारणा करून प्रस्ताव ठेवलेला आहे. मागिल वेळेस स.सदस्यांनी चांगली माहिती सभागृहात दिली होती व प्रशासन कसे काम करते हे पून्हा दाखवून दिले . सहा महिण्याच्या आत जागा घेतली नाही तर डिलीट होईल. परंतू श्री. गोटे यांनी लिहून दिले आहे की मी अर्जच दिला नाही. आजही श्री. गोटे यांनी १२७ ची नोटीस दिली आहे की नाही याचा खूलासा करावा. गोटे हे महापालिकेची दिशाभूल करीत आहे किंवा काय हा भाग नंतरचा आहे परंतू प्रशासनन अडचणीत येत आहे. श्री. गोटे यांनी नोटीस दिलीच नाही त्यामूळे हे डिलीस होण्याचा प्रश्नच येत नाही.

श्री. संजय सिरसाट :गोटेने जे शपथ पत्रावर ॲडेस दिला आहे त्यावर तुम्ही पत्रव्यवहार करीत असाल तर तो चूकीचा आहे. श्री. गोटेचे आताच पत्ता काय आहे खूलासा करावा.

श्री. अ. रशिद खान :जर गोटेने नोटीस दिली नसेल दुसरे व्यक्तीने दिली असेल तर त्यांचेवर पोलीसात गून्हा दाखल करावा.

श्री. संजय जोशी :आरक्षण डिलीट वगैरे होईल म्हणून म्हटले परंतू आरक्षण टाकण्याचा अधिकार सभागृहाचा आहे. टाकता येईल.त्याची चिंता प्रशासनाला कशासाठी. शहराची चिंता सर्वांनाच आहे.

मा. आयुक्त :आताच स. सदस्यांनी म्हटले आरक्षण टाकता येईल. आरक्षण टाकता येते परंतू तेथे महापालिका १० ते १५ वर्ष काहीच करीत नाही. १० वर्षा झाले नंतर संबधीतास १२७ ची नोटीस देता येते. व दिल्यानंतर ६ महिण्याच्या आत घ्यावे नसता सोडून दयावे. सभागृहाला जसे अधिकार आहे तसेच मिळकत धारकांना सूध्दा अधिकार आसतात. श्री. गोटे हे स्वतहून आले होते त्यांनी पेपरमधे वाचून की माझ्या नावावर कूणीतरी पैसे उचलले. ते माझे कडे आले होते त्याची हेरींग पण घेतली होती. त्यांना अशी भिती झाली होती की माझ्या नावावर कूणीतरी पैसे घेवून जाईल व जमिनही जाईल. याजागेचा मोबदला हे पूर्ण चौकशी झाल्यानंतर जिल्हाधिकारी देतात. श्री. गोटे यांनी मला असे विचारले होते की मी पत्र दिले नाही

ते मी देवू शकतो का ?श्री. गोटे यांनी ८ मे तारखेला पत्र दिले आहे तेंव्हा पासून आता सहा महिणयाचा कालावधी धरावा लागेल.

श्री. संजय जोशी :हा प्रस्ताव रद्य करावा. न्यायालयात प्रकरण दाखल करावे श्री. गोटे यांनी नोटीस दिलेली नाही. आता मा. आयुक्ताकडे सरेंडर झाले.मा. प्रधान सचिवांना श्री. गोटे यांनी अफिडेव्हीट दिले आहे.

मा.आयुक्त :तो माझेशी सरेंडर झाले नाहीत.त्यांनी विचारणा केली कोणी माझ्या नांवावर पैसे उचलतील मी विचारले तूम्ही पत्र दिले का ते म्हणाले नाही.तर त्यांनी मला सांगितले की आता मला विकायचे आहे मी सांगितले की जेंव्हा नोटीस देणार तेंव्हापासून सहा महिण्याच्या आत आम्ही विकत घेवू त्याची मूदत ८ मे पासून सूरू होते.

श्री. संजय जोशी :यापूर्वी या विषयावर जोरदार चर्चा झालेली होती. सहा. संचालक नगररचना यांनी त्यांना पोलीस स्टेशनला जायचे सांगितले .मा.आयुक्तांनी त्यांना सांगितले आहे की दुसरे कोणी पैसे उचलणार नाही.

मा.आयुक्त :पुर्वी संबधीत गोटे यांनी पत्र दिले नव्हते. म्हणून कुणीतरी खोटी सही करून पत्र दिले म्हणून त्यांना पोलीसात जाण्यास सागितले होते. जेंव्हा पत्र देतील तेंव्हा पासून सहा महिण्याची मूदत सूरू होईल. रस्ता जो आहे तो डी. पी. रोडमधे टाकला म्हणून प्लॅनींग ऑथर्टीला वाटते की रस्ता गरजेचा आहे. संबधीत व्यक्तीची मालकी आहेत्यांनी नोटीस दिलेली आहे. प्रोसेस सूरू करावी लागणार. दुसरी बाब नो डेव्हलपमेंन्ट झोनची होती. नो डेव्हलपमेंन्ट झोन असेल म्हणून रस्ता करायचा नाही असे नाही. बायपास रस्ते रिंगरोड असतात ते ९० टक्के नो डेव्हलपमेंन्ट झोनमधून जातात.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:स्थगित ठेवावा सविस्तर चौकशी करावी त्यानंतर निर्णय घ्यावा.

श्री. अ.साजेद अ.सत्तार :स्थगित ठेवावा .जुन्या शहरातिल रस्त्याचा विकास बाकी आहे चेलीपूरा ते रोषणगेट रस्ता बाकी आहे तसेच किराडपूरा ते भडकल गेट रस्ता भूसंपादन करणे बाकी आहे असे असतांना हा प्रस्ताव का आणला. ते का राहिले याचा खूलासा करावा.

मा.आयुक्त :सभागृहाने योग्य तो निर्णय घ्यावा.गरज आहे का पूर्ण रस्त्याचा विचार करण्यात यावा.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : स्थगित ठेवावा शहराच्या विकासा संदर्भात विचार करावा.या महानगरपालिकेचे गोटे नावाचे एक्स वाय झेड ने प्रस्ताव आणला होता.का? असे किती लोक आहे जे अर्ज देतात याचा विचार करावा साधा प्रश्न नाही हा गोटेचा प्रश्न नाही गोटेच्या नावाने हा प्रस्ताव आलेला आहे.आज वृत्तपत्रात आले की आयुक्तांना माहित नसतांना १.३८ कोटी रूपये देण्यात आले. अशा बातम्यामूळे महानगरपालिकेची बदनामी होत आहे. या बाबत मा. महापौर, आयुक्तांनी चौकशी करावी.संबधीत अधिकारी यांना शासन करावे. जे छापून येते त्या बाबतीत प्रशासनाने पारदर्शक भूमिका घ्यावी. पेपरला खूलासा करावा जागेची पाहणी करावी हा प्रस्ताव स्थगित ठेवावा. आवशकता आहे का ते बघावे त्यानंतर निर्णय घेण्यात यावा.

श्री. संजय सिरसाट :जे दोन तीन प्रश्न उपस्थित झाले त्यास बगल देण्यात आले खूलासा झालेला नाहीयापूर्वी प्रस्ताव सभागृहात आलेला होता पाच ते सहा तास चर्चा झालेली होती.मागच्या बैठकीत सदर प्रस्ताव जेंव्हा शहर सूधार समितीकडे गेला तेंव्हा १० लक्ष ऐवजी २.१० कोटी करण्यात आले परंतू आयुक्तांनी फक्त १० लक्षवरच सही केलेली होती. असे म्हटले होते. इतिवृत्तात सूध्दा आले की जे प्रशासन पत्र व्यवहार करीत आहे ते चूकीच्या पत्यावर करीत आहे. त्याचा सुध्दा खूलासा झालेला नाही. संबधीत व्यक्तीने प्रधान सचिवांना ॲफिडेव्हिट करून दिले स.

सदस्य श्री. जोशी यांनी सविस्तर माहिती दिली होती. चूकीच्या पत्त्यावरच त्या व्यक्तीशी पत्र व्यवहार केलेले आहे. सर्वसाधारण सभेत चर्चा झाल्यानंतर आठ दिवसात संबधीत गोटे नावाचे व्यक्तीला प्रशासनाने बोलवून घेतले. गेल्या सहा महिण्यापासून तो व्यक्ती पत्र व्यवहार करीत होता तेंव्हा जाणीव झाली नाही तेव्हा सागितले की पोलीस स्टेशनलमधे तक्रार दया. तू शासनाकडे जावे अमुक सूचना दया असे सहा. संचालक यांनी मान्य केले. प्रशासनावर आरोप होवू लागले तेंव्हा त्या गोटे नावाचे व्यक्तीला प्रशासनाने शोधून आणले. जो व्यक्ती प्रधान सचिवांना ॲफिडेव्हिट करून देतो तो साधा भोळा व्यक्ती नाही बातमी ऐकून आयुक्तांना भेटण्यासाठी येईल असे वाटत नाही. जो मूख्य व्यक्ती डहाळे नावाचा यास कधीच पत्र व्यवहार केलेला नाही. त्या गृह निर्माण संस्थेला कधीच पत्र व्यवहार केलेला नाही. गोटे डहाळे यांचे एकाच वेळी सुबूध्दी सूचली की मला स्पेस सूटू नये म्हणून मा. आयुक्तांच्यादालनात जावून बसायचे व खरेदी सूचना मान्य करायची. मागिल बैठकीत दिलेल्या आदेशाचे काय झाले याचा खूलासा अगोदर व्हावा. या बाजूची १०-१५ एकर जमीन मोठमोठे व्यापारी यांनी घेवून प्लॉटीग करून विक्री केलेली आहे. डहाळे यांनी बाजूचे सर्व पलॉट विक्री केले आहे. व २४ मीटर रस्त्याची जागा यासाठी ठेवली आहे की याचे महानगरपालिकेकडून पैसे घ्यायचे आहे. आणि प्लॉट धारकांना सांगायचे की ही जागा मी तूमच्यासाठी सोडलेली आहे. ही सर्व जागा नो डेव्हलपमेंन्ट झोनमधे येते. आज प्रत्येक नगरसेवक सांगतात की माझ्या वार्डात डांबरी रस्ता नाही. कूणाच्या फायदयासाठी आहे हा प्रस्ताव मंजूर करून नये . हा प्रस्ताव विखंडीत करावा. रस्त्याची गरज नाही.आवशकता वाटत असेल तर यावर विरोध करण्यासाठी आम्ही सदस्य मतदान घेण्यासाठी तयार आहोत.

मा.आयुक्त :प्रशासनावर आरोप केलेले आहे. की जेव्हा प्रशासन आरोपी झाले तेंव्हा संबधीतास पकडून आणले परंतू तसे झाले नाही.

श्री. संजय सिरसाट :आयूक्तांची मान्यता फक्त १० लक्षलाच होती २.१० कोटी कसे झाले यास जबाबदार कोण याचा खूलासा करावा. सहा. संचालक यांनी मागील बैठकीत असे म्हटले होते की मी संबधीत व्यक्तीला पोलीस स्टेशनमधे जाण्यास सांगितले. २.१० कोटी वर मी सही केलेली नाही हे आयूक्तांनी मागलि बेठकीत मान्यही केले होते. प्रस्ताव चूकीचा पाठविला होता. संबधीत अधिकारी दोषी आहे सभागृहाची त्यांनी दिशाभूल केली पोलीसात गुन्हा दाखल करावा म्हणून रूलींग दिले होते. का कार्यवाही केली नाही.

मा.महापौर :मागिल बैठकीत हा प्रस्ताव होता. जेंव्हा शहर सुधार समितीकडे हा प्रस्ताव गेला त्यावेळी १० लक्षवरच मा. आयुक्ताची सही आहे हे प्रशासनाने कबूल केले होते. जेव्हा शहर सूधार समितीच्या लक्षात आले की १६०० चौ.मी. ऐवजी १६०० रनिंग मिटर आहे त्यामूळे १०लक्ष ऐवजी २.१० कोटी झाले अशी दूरूस्ती केली. प्रश्न असा पडतो की सभागृहाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न होता की प्रशासनाची दिशाभूल करण्याचा हा प्रयत्न होता. ज्यावेळी सर्वसाधारण सभेपूढे प्रस्ताव पाठवता त्यावेळी आयूक्तांना सूध्दा त्याची कल्पना दिली नव्हती. सभागृहात चर्चा झाल्यानंतर त्यात सहा. संचालक नगररचना यांची त्यात चूक होती. म्हणून सभागृहाच मत लक्षात घेता त्यांचेवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. या संबधीत मा. आयुक्तांचे मत काय आहे सभागृहाला माहिती दयावी.

मा.आयुक्त :ज्या लोकांनी अर्ज दिला किती जागा विकत घ्यावी जेंव्हा संचिका माझ्याकडे आली तेंव्हा रक्क्म ही १० लक्षवर मी सही केलेली होती. त्यानंतर हा प्रस्ताव शहर सूधार समितीकडे गेला व त्यावेळी लक्षात आहे की चूक झाली १० लक्ष ऐवजी २.१० कोटी रक्कम आहे. समितीने मान्य करून ते सर्वसाधारण सभेकडे

पाठविले. २.१० कोटी रक्कम झाली ती कशामूळे झाली हे मला संबधीत अधिकारी यांनी निदर्शनास आणून दयावयास पाहिजे.होते.दूसरे असे की जेव्हा १२७ ची नोटीस येते तेंव्हा ती जागा किती रक्कमीची आहे याला महत्व नसते. रक्क्म वाढवू शकते जिल्हीाधिकारी हे त्याचे व्हॅल्यूशन ठरवतील कोणास मोबदला दयावयाचा ते ठरवतिल मागच्या वेळी मी असे डिसीजन घेतले होते की जे तीन लोकोंची नावे कागदावर आहे त्यांना बोलावून घेवून तिघापैकी जर कूणी अर्जच दिला नसेल तर कार्यवाही करता येणार नाही. प्रशासनाने कूणाला बोलवून आणलेले नाही त्या शब्दाला माझा अक्षेप होता. गोटे यांनी वृत्तपत्रात वाचून ते आले होते.

श्री.संजय सिरसाट :जो पत्रव्यवहार नगररचना विभत्तगाचे अधिकारी करीत होते ते चूकीच्या पत्त्यावर करीत होते हे बरोबर आहे का

मा. आयुक्त :श्री. गोटेचा अर्ज होता. सातबारावर कूणाचा पत्ता नसतो. ज्यांनी अर्ज केला माझी जमिन विकत घ्यावी त्यावर जो पत्ता होता त्यानूसार पत्रव्यवहार करीत होते.गोटे पेपरमधे वाचून आले होते. त्यांना मी सांगितले की आपण नोटीस दिली नसेल तर ड्राप करू त्यांनी म्हटले आज अर्ज दिला तर चालेल का मी सागितले की आज दिले तर सहा महिण्याच्या आत कार्यवाही करावी लागेल. आता श्री. गोटे यांनी ८ तारखेला नोटीस दिलेली आहे आठ मे पासून कालावधी सूरू होतो. परंतू सभागृह हे सक्षम आहे निर्णय घेवून शकते. खरोखरच त्या रस्त्याची गरज आहे का? रस्त्याची गरज नसेल तर तसा ठराव करावा असेल तर जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवावा लागेल.

श्री. संजय सिरसाट :ज्यानी कूणी पत्र व्यवहार केलेला आहे तो विषय आता संपलेले आहे असे आयूक्तांचे मत आहे. हा जो प्रस्ताव आला तो मंजूर करायचा की फेटाळायचा हे सभागृहाने ठरवावे.

मा.आयुक्त :ज्यांनी चूकीने पत्र देवून मागणी केली त्या संबधी पोलीस केस केलेली आहे चौकशी होत राहील.

श्री. पाथ्रीकर दत्ताभाऊ :महानगरपालिकेत गोटे सारखे बरेच लोक बसलेले आहे दूसरे कूणी नसून आपले कर्मचारी आहे. हा ठराव महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी तयार करून गोटेच्या नावावर आणलेला आहे. या संबधी सखोल चौकशी करावी व हा ठराव रद्य करावा. पोलीस विभागा मार्फत याची चौकशी करावी व संबधीतावर कार्यवाही व्हावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:रद्य करायचातर करावे सभागृहाचा अधिकार आहे. सभागृह नेता यांनी जे आरोप केले ते आरोप नसून गैरसमज आहेत.

श्री. संजय सिरसाट :आरोप केलेले नाही. सत्य परीस्थिती सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली आहे.

मा.आयुक्त :पूर्वी तीन लोकांनी अर्ज केला होता त्यापैकी एक नक्कीच चूकीचा होता. तीन लोकांच्या बाबतीत कार्यवाही सूरू झाली सहा महिण्याची मूदत संपली डहाळे नावाचे व्यक्ती यांनी येवून सांगितले की सहा महिण्याची मूदत ही २३ मेला संपलेली आहे परंतू आपण असा स्टॅड घेवू शकू की कोर्टात तीन लोकांपैकी शायद एक व्यक्तीने कूणीतरी चूकीने नोटीस दिली होती. पोलीस केस झाली म्हणून घोळ झाला म्ळणून सहा महिण्याची मूदत जी आहे ती ८ मे पासून गृहीत धरली आहे. माझे असे मत आहे की एक कमेटी करावी व त्या कमेटीने पाहणी करावी की तेथे रस्त्याची गरज आहे का गरज पाहण्यात यावे.

श्री. संजय सिरसाट :हया कार्यवाहीसाठी सहा महिण्याचा कालावधी असतो पाचव्या महिण्यात प्रस्ताव येतो पूढील सभा तहकूब झाली किंवा झाली नाही तर सहा महिने उलटतात व प्रशासन सर्वसाधारण सभेची मान्यता न घेताच प्रस्ताव पाठवून देतात असे घडलेले आहे. आता सर्वाचे एक मत झाले आहे की हा ठराव रद्य करावा.

मा. आयुक्त :नियोजन प्राधिकरण म्हणून जेंव्हा हा रस्ता सर्वसाधारण सभेने विकास आकाराखडयात टाकला काहीतरी प्लॅन करून टाकलेला आहे आजही या रस्त्याची गरज नाही. ही जागा विकत घेण्यामधे प्रशासनाने स्वत:प्रपोजल केलेले नाही. परंतू त्या मालकाच्या जागेवरून रस्ता जातो त्यांना कायदयाचे अधिकार आहे म्हणून त्यांनी अर्ज दिला आहे.

श्री. संजय जोशी :आवशकता पडली तर बघता येईल. हा ठराव रद्य करावा अशी विनंती आहे.

मा.आयुक्त :स्थगिती दयावी कमेटी नियूक्त करावी गरज वाटत असेल तर मंजूर करावा नसता रद्य करावा. येथे रस्ता करता येणार नाही म्हणून विचार करून निर्णय घ्यावा.

श्री. संजय जोशी :कोर्टात कूणी जाईल त्याची भिती बाळगू नये जेंव्हा गरज पडेल तेंव्हा डी. पी प्लॅनमधे टाकता येईल. या जागेच्या बाजूला सर्व लेआऊट मंजूर झालेले आहे जाण्यास रस्ता नाही.

श्री. प्रशांत देसरडा :संबधीताने १२७ ची नोटीस दिलेली आहे का याचा खूलासा अदयाप केलेला नाही.

श्री. संजय सिरसाट :सर्वाचे एक मत झाले आहे की हा प्रस्ताव रद्य करावा यात फार मोठा भ्रष्टाचार होवू शकतो.

मा. महापौर :सभागृहाचे मत लक्षात घेता हा प्रस्ताव एकमताने रद्य करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव रद्द करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

श्री. वसंत नरवडे :प्रस्ताव ज्यांनी आणला होता त्याची चौकशी झाली पाहिजे. तसे आदेशीत करावे.

श्री. देसरडा प्रशांत :ज्यांनी चूकीने प्रस्ताव सादर केला व सभागृहाची व प्रशासनाची दिशाभूल केली त्याचेवर काय कार्यवाही करणार आहे.

मा. महापौर :निर्णय घेतलेला आहे.मागिल बैठकीत याच सभागृहात या संबधाने आदेशीत केलेले आहे त्यानूसार प्रशासन कार्यवाही करेल.

## स.सदस्यांचे प्रस्ताव

**विषय क्र. २५५/९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.६१ मधिल सन्मित्र कॉलनीस पूर्वी महानगरपालिकेच्या नकाशात ॲप्रोच रस्ता (डी.पी.रोड) होता व सदरील कॉलनीस हा एकमेव रस्ता असतांना सन २००१ च्या विकास आराखड्यात मात्र हा डी.पी.रोड मनपाच्या नकाशातून वगळण्यात आला असल्याने या सोसायटीत करावयाच्या मंजुर असलेल्या ०५.०० लक्षच्या स्पिलओव्हर काम करण्यास अडचण होत आहे.

तरी सदरील डी.पी.रोडचा पूर्ववत मनपाच्या नकाशात समावेश करावा व सोसायटी अंतर्गत मनपाने मंजुर केलेली कामे करणेस मंजुरी देण्यांत यावी, करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.कला सुरेश बोरामणीकर, सौ.रेखा कैलास काथार

अनुमोदक : श्री.पुरूषोत्तम ठाकुर, सौ.शोभा हरीचंद्र मिटकर

मा.महापौर :मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.६१ मधिल सन्मित्र कॉलनीस पूर्वी महानगरपालिकेच्या नकाशात असलेला ॲप्रोच रस्ता सन २००१ च्या विकास आराखड्यात डी.पी.रोड महानगरपालिकेच्या नकाशातून वगळण्यात आला असल्याने या सोसायटीत करावयाच्या मंजुर असलेल्या र.रू.०५.०० लक्षच्या स्पिलओव्हरचे काम करण्यास अडचण होत असल्यामूळे, सदरील डी.पी.रोडचा पूर्ववत महानगरपालिकेच्या नकाशात समावेश करणेस व सोसायटी अंतर्गत मंजुर असलेली कामे करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५६/१० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्रं.७३ एस.टी.कॉलनी प्रबोधनकार ठाकरे नगर एन-२, परिसरातील क्रिकेट स्टेडियमला छत्रपती शिवाजी महाराज क्रिकेट स्टेडियम असे नांव देण्यांत यावे. अशी येथील नागरीकांची सन १९९३ पासून मागणी आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.दामोधर माधवराव शिंदे

अनुमोदक : ०१.श्रीमती जयश्री किवळेकर,०२.श्री.बाबासाहेब डांगे,०३.श्री.भगवान घडमोडे, ०४.श्री.नारायण कुचे, ०५.श्री.बन्सी गांगवे (मामा)

**संवाद :**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : नाव देण्याचे प्रस्ताव कमेटीकडे पाठवावे. एकाच रस्त्याला दोन नावे दिल्यास वाद होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या रस्त्यास २० वर्षापूर्वी जवाहरलाल नेहरू नांव दिलेले आहे समिती मार्फत यावे लोकांना वाटेल की जवाहरलाल नेहरू यांचे नांव कमी करून छत्रपती शिवाजी महाराज मार्ग नांव दिले आहे समिती मार्फत यावे जर जवाहरलाल नेहरू यांचे नाव दिले नसेल तर हरकत नाही.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर :नाव देण्या बाबत पॉलीसी ठरवावी म्हणून मागच्या बैठकीत मी बोललो होतो. कोणत्या रस्त्याला कोणते नाव दिलेले आहे याची चौकशी व्हावी एकाच रस्त्याला दोन नावे देण्यात येवू नये. माहिती घेवूनच त्या त्या रस्त्याला नावे देण्यात यावे.

मा. महापौर : जे नाव देण्या बाबतचे १०.११ क्रमाकांचे प्रस्ताव आहे त्या संदर्भात अगोदर नाव दिले असेल तर नामंजूर. नसेल दिले तर तो प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रं.७३ एस.टी.कॉलनी प्रबोधनकार ठाकरे नगर एन-२, परिसरातील क्रिकेट स्टेडियमला छत्रपती शिवाजी महाराज क्रिकेट स्टेडियम असे नांव देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, तथापी अगोदर नांव दिलेले असल्यास प्रस्ताव नामंजुर समजण्यात यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५७/११ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, चिकलठाणा ते बाबा पेट्रोल पंप या मार्गाच्या रस्त्याला ''छत्रपती शिवाजी महाराज महामार्ग'' असे नांव देण्यांत यावे.

सुचक : १.श्री.बाबासाहेब लक्ष्मणराव डांगे, २.श्री.भागवत कराड,३.श्री.भगवान घडमोडे

अनुमोदक : १.श्री.सतिष कटकटे,२.श्री.साहेबराव कावडे, ३.श्री.दामोधर शिंदे,४.श्री.विजय खुडे, ५.श्री.बन्सीलाल गांगवे (मामा),६.श्री.संतोष खेंडके,७.श्री.सुरेंद्र कुलकर्णी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा ते बाबा पेट्रोल पंप या मार्गाच्या रस्त्याला ''छत्रपती शिवाजी महाराज महामार्ग'' असे नांव देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, तथापी अगोदर नांव दिलेले असल्यास प्रस्ताव नामंजुर समजण्यात यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५८/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकामध्ये संगणकीकरण इ-गव्हर्नन्स, वेबसाईट विकसीत करणे, विविध विभागाचे सॉफ्टवेअर विकसीत करून घेणे, मालमत्ता, पाणीपुरवठाचे देयके अद्ययावत करणे, एक खिडकी योजना राबवणे व अलीकडेच सिडकोचे हस्तांतरण झाल्यामूळे तेथील कामाचा व्याप वाढलेला असून त्यानंतर सर्व प्रभाग कार्यालयीन कामाचे देखील संगणकीकरण होत आहे. वरील सर्व कामासाठी संगणक विभागास आवश्यक ती पदे निर्माण झालेली नाही. त्यासाठी महानगरपालिका अस्थापनेवर नवी मुंबई, पिंपरी चिंचवड, पुणे,कल्याण डोंबिवली व इतर मनपामध्ये असलेले सिस्टीम ॲनलिस्ट (पध्दती विवेचक) किंवा सिस्टीम मॅनेजर (ई-प्रशासन) हे पद निर्माण करणे आवश्यक आहे.

सदर पदासाठी राज्यातील मनपासाठी अस्थापनेवर आकृती बंध निर्धारित करणेसाठी प्रस्तावित आकृती बंधातील अ.क्र.१२१ वर प्रस्तावित शैक्षणिक अर्हता, वेतनश्रेणीमध्ये व मनपातील पात्र

कर्मचाऱ्यांमधून पदोन्नतीने भरणे करिता सिस्टीम ॲनलिस्ट (पध्दती विवेचक) किंवा सिस्टीम मॅनेजर (ई-प्रशासन) चे एक पद मनपा अस्थापनेवर निर्माण करणेसाठी सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.रशिद खान (मामु) अनुमोदक : श्री.संजय शिरसाट,श्री.मुजीब खान,श्री.भागवत कराड

श्री. देसरडा प्रशांत : महानगरपालिका क वर्गातून ड वर्गात गेलेली आहे. शासनाचा काही जी. आर. प्राप्त झालेला आहे काय याची माहिती दयावी.

मा.महापौर : प्रस्ताव स्थगित करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

मा. महापौर : ऐनवेळचे सर्व प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. २५९/१ :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण (२) व्यतिरिक्त शासन मंजुर सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.७९ अन्वये मा.सभापती, माध्यमिक व पूर्व माध्यमिक शाळा समिती यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दि.८ मे २००६ रोजी झालेल्या सभेत माध्यमिक व पूर्व माध्यमिक शाळा समितीचे सभेत इयत्ता बालवर्ग ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेष योजनेंतर्गत दोन गणवेष देण्यांत येतात. त्याच धर्तीवर शालेय विद्यार्थ्यांना तीन गणवेष, एक टाय,एक बुटाचा जोड,पाय मोजे (दोन जोड) व एक स्वेटर देण्याचे प्रस्तावावर विचार विनिमय करून त्यास मान्यता प्रदान केली आहे.

विद्यार्थ्यांना दोन जोड रंगीत गणवेष व एक जोड पांढरा गणवेष देण्याचे प्रस्तावित आहे. यावर्षी दिल्या जाणाऱ्या गणवेषाच्या रंगात बदल करण्याचे प्रस्तावित केले असून त्या सोबत दोन जोड बुट, पायमोजे व नेक टाय देण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार देण्यात येणाऱ्या गणवेषाचा संभाव्य नमुना, रंग इत्यादी निश्चित करण्यात येईल, त्यानुसार कलर शर्ट तसेच पांढरा शर्ट/कमीज, कलर प्लेन हॉफ पॅन्ट व पांढरी हाफ पॅन्ट/सलवार पॅन्ट/स्कर्ट देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. नेक टायचा रंग,ओढणी,पायमोजे, तसेच फुल स्वेटर यांचे रंग निश्चित करण्याचे अधिन त्याचप्रमाणे रेक्झीन शुज काळा रंगाचा तसेच कॅन्व्हॉस शुज पांढरा रंगाचा व पांढरे पायमोजे देण्याचे प्रस्तावित केले आहे. नेक टायवर महानगरपालिकेचा लोगो आणि शर्टच्या खिशावर मनपा औरंगाबाद (मराठीत) ची पट्टी असावी असे प्रस्तावित केले आहे. उपरोक्त विवरणानुसार मनपा शालेय विद्यार्थ्यांना सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश योजनेंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या गणवेष व इतर संलग्न साहित्य या करिता चालू अर्थ संकल्पात अनुक्रमे रू.५०.०० लाख व रू.२५.०० असे एकूण रू.७५.०० लाख इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. निविदा प्रक्रियेस मान्यता मिळावी, करिता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेचे विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांना सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश योजनेंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या गणवेष व इतर संलग्न साहित्य या करिता चालू अर्थ संकल्पात अनुक्रमे रू.५०.०० लक्ष व रू.२५.०० लक्ष असे एकूण रू.७५.०० लक्ष करण्यांत आलेल्या आर्थिक तरतूदीस तसेच या वर्षी दोन ऐवजी तीन गणवेष विविध रंग संगतीमध्ये पुरवठा करण्यात येत असल्यामूळे अर्थसंकल्पात ठेवण्यात आलेल्या तरतुदीमध्ये गणवेषाची निविदा अंतिम झाल्यानंतर काही प्रमाणात खर्च वाढल्यास,वाढीव खर्चास मान्यता देण्यात येते, तसेच वाढीव खर्चासाठी स्वतंत्र तरतुद उपलब्ध करून देण्यांत येईल. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६०/२ :**

आयुक्त,महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मनपा टाऊन हॉल इमारतीचे जतन करणे व सुशोभिकरण करणे, संरक्षित भिंतीचे काम करणे, लॅण्ड स्केपींग करणे, टॉयलेट ब्लॉक बांधणे इत्यादी व इतर कामे करणेस्तव सा.बां. विभागाचे सन २००४-०५ च्या जिल्हा दरसूची नुसार रक्कम रू.५०,००,०००/- चे प्रथम टप्प्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. सदरील कामासाठी सन २००६-०७ या आर्थिक वर्षा अंतर्गत ''शहर सौंदर्यीकरण व रस्ते दुभाजके'' या लेखाशिर्षा अंतर्गत ५०,००,०००/- व मा.खासदारांचा स्थानिक विकास कार्यक्रमा अंतर्गत मा.खासदार श्री.राजकुमार धुत यांचे प्राप्त निधी रक्कम रू.२५,००,०००/- असे एकूण ७५,००,०००/- लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे.

त्यानुसार सदरील कामाचे प्रथम टप्याचे अंदाजपत्रक रक्कम रू.५०,००,०००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका टाऊन हॉल इमारतीचे जतन करणे व सुशोभिकरण करणे, संरक्षित भिंतीचे काम करणे, लॅण्ड स्केपींग करणे, टॉयलेट ब्लॉक बांधणे इत्यादी व इतर कामे करणेच्या रक्कम रू.५०,००,०००/- चे प्रथम टप्प्याचे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६१/३ :**

आयुक्त,महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिडको प्रशासकीय इमारतीमध्ये महानगरपालिकेचे कार्यालय स्थापित करण्यासाठीचे कामे करणे म्हणजेच अधिकारी,पदाधिकारी,यांचेसाठी स्वतंत्र कॅबिन,कर्मचाऱ्यांसाठी पार्टीशन करून बसण्याची व्यवस्था करणे, शौचालयाची व्यवस्था, लॅण्डस्केपींग,पेव्हींग ब्लॉक,पार्कींग व्यवस्था इत्यादी कामे करणेस्तव सा.बां.विभागाचे सन २००४-०५ च्या जिल्हा दरसूची नुसार रक्कम रू.२८,३५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदरील कामाचा खर्च ''प्रशासकीय इमारत'' या लेखाशिर्षकाअंतर्गत सन २००६-०७ या आर्थिक वर्षात १०.०० लाखाची तरतूद उपलब्ध करण्यात आलेली आहे व उर्वरित१८,३५,०००/- ही रक्कम सिडको विकासासाठी प्राप्त १५.०० कोटी मधून शिल्लक राहीलेल्या रक्कमेतून तरतूद करण्यात येईल.

त्यानुसार प्रस्तावित कामाचे र.रू.२८,३५,०००/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको प्रशासकीय इमारतीमध्ये महानगरपालिकेचे कार्यालय स्थापित करण्यासाठीचे कामे करणे म्हणजेच अधिकारी,पदाधिकारी,यांचेसाठी स्वतंत्र कॅबिन,कर्मचाऱ्यांसाठी पार्टीशन करून बसण्याची व्यवस्था करणे, शौचालयाची व्यवस्था, लॅण्डस्केपींग,पेव्हींग ब्लॉक,पार्कींग व्यवस्था इत्यादी कामे करणेच्या रक्कम रू.२८,३५,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६२/४ :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, १२ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशी नुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकरीता नगर विकास विभागाने निधीचे वितरण निश्चित केलेले असून, सदरील निधी नागरी संस्थांना वितरीत करण्यापूर्वी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून सदर प्रस्ताव तातडीने नगर परिषद प्रशासक,मुंबई कार्यालयाकडे विहीत कालावधी मध्ये पाठविणे आवश्यक आहे, नसता निधी इतर नागरी संस्थांना वितरीत केला जाईल.

औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाने सन १९७४-७५ मध्ये जायकवाडी जलाशयावरून २८.०० द.ल.ली. क्षमतेच्या योजनेचे संकल्पन करून योजना कार्यान्वित केली. या योजने अंतर्गत नक्षत्रवाडी संतुलन टाकीपासून क्रांतीचौक पर्यंत ७०० मि.मी. व्यासाची पी.एस.सी. गुरूत्व वाहीनी टाकलेली आहे. पी.एस.सी. पाईपचे आयुष्य ३० वर्ष असून, आज रोजी या वाहिनीस ३२ ते ३३ वर्ष पूर्ण झालेले आहे. एकूण लांबी पैकी कांचनवाडी ते रेल्वेस्टेशन पर्यंतच्या ३००० मी.लांबीतील पाईप ह नेहमी फुटत असतात. पाईपच्या जॉईटमधून गळती होणे, पाईप अचानक फुटणे असे प्रकार वारंवार घडतात, परिणामी शहराचा पाणी पुरवठा विस्कळीत होतो.

करीता ३००० मी.पी.एस.सी.पाईप बदलून एम.एस.पाईप टाकण्याच्या कामाचे अं.र.रू.३००.०० लक्षचे तयार करण्यात आले आहे.करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारणसभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कांचनवाडी ते रेल्वेस्टेशन पर्यंतच्या ३००० मी.लांबीतील पी.एस.सी. पाईप बदलून एम.एस.पाईप टाकण्याच्या कामाचे रक्कम रूपये ३००.०० लक्ष चे अंदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६३/५ :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पुंडलिकनगर परिसरातील वसाहतींना पाणी पुरवठा करण्याकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने रूपये ६७.३० कोटी किमंतीची योजना व रूपये ९.९३ कोटी किमंतीची योजना अशा दोन योजनांचे संकल्पन करून सन १९९८ व १९९९ मध्ये योजनेस प्रशासकीय मान्यता घेतली आहे.

रूपये ६७.३० कोटी किमंतीच्या योजनेतून जलकुंभ बांधणे, साठवण टाकी (संप) बांधणे ही कामे पुंडलिकनगर परिसराकरीता करण्यात आली. तसेच रूपये ९.९३ कोटी किमंतीच्या योजनेतून गुरूत्व वाहिनी, जलकुंभ भरण्याकरीता उदधरण वाहिनी व पुंडलिकनगर परिसरातील विविध वसाहतींमध्ये वितरण वाहिन्यांचे कामे भागश: पूर्ण केली, तथापी निधी अभावी प्रस्तावीत असलेली सर्व कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पूर्ण झालेली नाही.

दिनांक १६.०५.२००६ रोजी झालेल्या बैठकीत मा.महापौर यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे पुंडलिकनगर परिसरातील उर्वरित भागांमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राहीलेली वितरण वाहिन्यांची कामे महानगरपालिकेच्या निधीतून करण्याबाबत सविस्तर अंदाजपत्रक रक्कम रूपये ७०.४३ लक्षचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दरसूची २००५-०६ नुसार तयार करण्यात आलेले आहे.

पुंडलिकनगर परिसरातील वसाहती या पूर्णपणे अनधिकृतरित्या वसलेल्या असून, महाराष्ट्र शासनाने केलेल्या गुंठेवारी कायद्या अंतर्गत येथील घरे नियमीत झाल्याशिवाय या भागास सोयी सुविधा देणे विशेषत: पाणी पुरवठा करणे महानगरपालिकेस शक्य नाही. सदर अंदाजपत्रकास मान्यता मिळाल्यावर निविदेची कार्यवाही करण्यात येईल. तथापी गुंठेवारी कायद्याअंतर्गत या परिसरातील किमान ८०% नागरीकांनी रक्कमेचा भरणा केल्यानंतरच व प्रशमन शुल्क वसूलीच्या प्रमाणात या कामाचे कार्यादेश देण्यात येतील.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पुंडलिकनगर परिसरातील उर्वरित भागांमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राहीलेली वितरण वाहिन्यांची कामे महानगरपालिकेच्या निधीतून करण्याबाबत सविस्तर रक्कम रूपये ७०.४३ लक्षचे अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत येते. तसेच गुंठेवारी कायद्याअंतर्गत या परिसरातील किमान ८०% नागरीकांनी रक्कमेचा भरणा केल्यानंतरच व प्रशमन शुल्क वसूलीच्या प्रमाणात या कामाचे कार्यादेश देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६४/६ :**

१. अग्नीशमन दलासाठी अग्नीशमन साहित्य खरेदीची आर्थिक तरतूद रूपये एक कोटी सन २००६-०७ साठी ठेवण्यात आलेली आहे. त्यामधून पम्प खरेदी ४ नग रूपये २७,४४,०००/- आर्थिक व प्रशासकीय मान्यतासाठी सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव व निर्णयास्तव सादर.

२. अग्नीशमन दलासाठी होस पाईप खरेदी करणे आवश्यक आहे, त्यानुसार प्रशासकीय मान्यता नंतर रूपये २८,४२,९२०/- रूपयाची आर्थिक व प्रशासकीय मान्यतेसाठी सर्वसाधारण सभे समोर निर्णयास्तव व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अग्नीशमन दलासाठी अग्नीशमन साहित्य खरेदीसाठी सन २००६-०७ साठी ठेवण्यात आलेली आर्थिक तरतूद रूपये एक कोटी मधून पम्प खरेदी ४ नग रूपये २७,४४,०००/- तसेच अग्नीशमन दलासाठी होस पाईप खरेदी करणे रूपये २८,४२,९२०/- रूपयाच्या आर्थिक तरतूदीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६५/७ :**

सहाय्यक संचालक, नगर रचना,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करतात की, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत वसाहती ह्या महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम २००१ अंतर्गत नियमाधीन करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. परंतु महानगरपालिका हद्दीतील काही वसाहती ह्या मंजुर विकास योजनेतील आरक्षणाने बाधीत होतात,अशा वसाहतीमधील मिळकती गुंठेवारी अधिनियमान्वये नियमाधीन करणे बाबत जा.क्र./मनपा/नरवि/गुंठे/१६९२/२००४ दिनांक ०२ जुलै २००४ च्या पत्रान्वये शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले आहे.

त्यानुषंगाने गुंठेवा/१००४/९८८/प्रक्र./१०६/२००४/नवि-३० नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई दिनांक १४ सप्टेबंर २००४ पाठविण्यात आलेल्या शासनाच्या अभिप्रायात महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणी वाढ व नियंत्रण) अधिनियम-२००१ च्या कलम ५ (१) मध्ये गुंठेवारी विकास नियमाधीन केल्यावर संबंधीत जागेबाबत विकास योजना किंवा प्रादेशिक योजनेच्या तरतुदीमध्ये आपोआप फेरबदल झाल्याचे मानण्यात येईल, अशी स्पष्ट तरतूद असल्याचे नमुद करून महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमाच्या कलम ३७ ची आवश्यकता नाही असे म्हटले आहे व दिनांक ०६.०५.२००२ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयाकडे झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताद्वारे सार्वजनिक प्रयोजनार्थ आरक्षीत असलेल्या भूखंडावर अनाधिकृत बांधकामे नियमाधिन करतांना सार्वजनिक प्रयोजनार्थ आरक्षीत असलेल्या जागांची खरोखरच आवश्यकता आहे काय? याबाबतचा निर्णय नियोजन प्राधिकरणाने द्यावा व सार्वजनिक हीतासाठी जागा आवश्यक नसतील अशा जमीनीवर अस्तीत्वात असलेले भूखंड/अभिन्यास नियमित करता येतील असे सर्व महानगरपालिकांना कळविले आहे.

उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भाने सोबत जोडलेल्या परिशिष्टातील आरक्षणे खालील अटी नुसार वगळण्यात यावीत.

१. आरक्षणातील ज्या मिळकती १ जानेवारी २००१ पूर्वीची आहेत तेवढेच क्षेत्र आरक्षण वगळण्यास पात्र राहील.

२. १ जानेवारी २००१ नंतरच्या मिळकतीचे क्षेत्र आरक्षणातून वगळण्यात येणार नाही.

३. वसाहतीतील सहन जागा ही १ जानेवारी २००१ नंतरची असेल तर ती आरक्षणातून वगळली जाणार नाही.

जसे-जसे नागरीकांचे प्रस्ताव प्राप्त होतील त्यानुषंगाने प्राप्त परिस्थितीचा विचार करून वेळोवेळी आरक्षणाचे प्रस्ताव सादर करण्यात येतील.

करीता आरक्षण वगळण्याच्या कार्यवाहीस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभे समोर सादर.

## वगळण्यात येणाऱ्या आरक्षणाचे परिशिष्ट

| वसाहतीचे नांव | आरक्षण क्र. | आरक्षण प्रकार | शेरा |
|---|---|---|---|
| न्यु नंदनवन कॉलनी | २३,२४<br>२५,<br>२७ | No.Develop., Nala<br>No.Develop.<br>No.Develop. | |
| वृंदावन कॉलनी | | No.Develop. | |
| माजी सैनिक कॉलनी | ९ | P.S. | |
| नेहरूनगर हत्तेसिंगपुरा | १७०,१७१,<br>१७२ | P.G.H.G.<br>SC,VM.L.I.B. | |
| बाबर कॉलनी,नाहीदनगर | १७३,१७४<br>१७५,१७६ | P.G.SCP<br>P.S.H.D. | |
| बौध्दनगर उत्तमनगर | | | |
| महुनगर सौजन्यनगर | २७९,२७८ | Nala | |
| न्यु शांतीनिकेतन कॉलनी | २२२,२२३ | P.S.P.G. | |
| वसंतनगर | | | |
| शिवशंकर कॉलनी | २७५,२७६<br>२७७ | P.S.,H.S.<br>P.G. | |
| बाळकृष्ण नगर | २४३,२४४<br>२४२,२४१ | P.G.H.S.<br>H.D.SC.PLP | |
| चौधरी कॉलनी | | Shopping | |
| गजानन कॉलनी | २३२,२३१<br>२३० | G.P.G.<br>P.S. | |
| विशालनगर | २२५,२२६<br>२२४ | P.G.P.S.<br>H.S. | |
| हर्सूल | १५१,१५२<br>१५६,८,९<br>१५७,१३०<br>१३८,१८०<br>१८२,४<br>१८८<br>१७९,१५,१८ | No.Develop.<br>APMC, P.S.,P.G.<br>W.S.R.,No.Develop.<br>No.Develop H.S.<br>No.Develop Garden<br>P.G.<br>A.P.M.C. | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत वसाहती ह्या महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम २००१ अंतर्गत नियमाधीन करण्याची कार्यवाही संदर्भात सार्वजनिक प्रयोजनार्थ आरक्षीत असलेल्या भूखंडावर अनाधिकृत बांधकामे नियमाधिन करतांना वगळण्यात येणाऱ्या आरक्षणाच्या परिशिष्टात दर्शविण्यांत आलेली आरक्षणे प्रस्तुत प्रस्तावातील अट क्र.१ ते ३ नुसार वगळण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६६/८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद एकात्मिक रस्ते (IRDP) कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत औरंगाबाद शहरातील दोन रस्ते नागपुर पॅटर्नप्रमाणे विकसित करण्यात येणार आहे. सदर रस्ते खालीलप्रमाणे आहेत.

०१. महावीर चौक ते चिकलठाणा रस्ता (यातील महावीर चौक ते क्रांतीचौक हा रस्ता महानगरपालिकेच्या मालकीचा आहे.)

०२. रेल्वेस्टेशन ते दिल्लीगेट ते हर्सूल टी पॉईट (यातील रेल्वेस्टेशन ते दिल्लीगेट पर्यंतचा रस्ता हा महानगरपालिकेच्या मालकीचा आहे.)

तरी IRDP अंतर्गत उपरोक्त दोन रस्ते नागपुर पॅटर्नप्रमाणे विकसीत करण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद एकात्मिक रस्ते (IRDP) कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत औरंगाबाद शहरातील खालीलप्रमाणे दोन रस्ते नागपुर पॅटर्नप्रमाणे विकसित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

०१. महावीर चौक ते चिकलठाणा रस्ता (यातील महावीर चौक ते क्रांतीचौक हा रस्ता महानगरपालिकेच्या मालकीचा आहे.)

०२. रेल्वेस्टेशन ते दिल्लीगेट ते हर्सूल टी पॉईट (यातील रेल्वेस्टेशन ते दिल्लीगेट पर्यंतचा रस्ता हा महानगरपालिकेच्या मालकीचा आहे.)

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६७/९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबादमध्ये प्रथमच महानाट्य महासुर्यचा आयोजन करण्यात येत आहे. सदरचे नाट्य हे विश्व रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवनावरील महानाट्य होय. सदरच्या नाट्यासाठी व आयोजनासाठी ०७ लाख रूपये खर्च अपेक्षित असून यापैकी मनपाने रूपये ०३ लाखाची आर्थिक मदत किंवा मानधनचा निधी उपलब्ध करून देण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.प्रा.डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर अनुमोदक : श्री.हिम्मतराव दाभाडे, श्री.नासेर मो.नाहदी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबादमध्ये महानाट्य महासुर्यचा आयोजन करण्यात येत आहे. सदरच्या नाट्यासाठी व आयोजनासाठी रूपये ०३ लाखाची आर्थिक मदत किंवा मानधन निधी यापैकी जे कमी असेल तो निधी उपलब्ध करून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.